(९)

प्रकरण क्रमांक १ :- माहे ऑगस्ट २००२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यापैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ [१] मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या "महापौर" या पदावर निवड करणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका ठराव क्रमांक १ दि. २८/०८/२००२.

ठराव :- १

दिनांक ११ ऑगस्ट २००२ मध्ये झालेल्या पहील्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यापैकी एका सदस्याची माहे २८ ऑगस्ट २००२ ते २७ फेब्रुवारी २००५ या अडीच वर्षाकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ [१] अन्वये महापौर पदावर निवड करावयाची आहे. या निवडणूकीसाठी एकूण २ उमेदवारांनी त्यांची नामनिर्देशन पत्र दाखल केली होती. नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या तारखेत व विहित मुदतीत कोणीही आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले नाही, म्हणुन या निवडणूकीकरिता अनुक्रमे [१] जानी कैलासबेन दिनेशचंद्र, [२] श्रीमती मेंडोन्सा मायरा गिल्बर्ट यांची नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची "महापौर" या पदावर निवड करावयाची असल्याने व एकापेक्षा जास्त उमेदवार महापौर पदासाठी शिल्लक राहिल्याने या नेमणूकीसाठी गुप्त पध्दतीने मतदान घेण्यात आले. मतदान घेता, [१] जानी कैलासबेन दिनेशचंद्र यांना २५ मते मिळाली, [२] मेंडोन्सा मायरा गिल्बर्ट यांना ५४ मते मिळाली. मेंडोन्सा मायरा गिल्बर्ट यांना सर्वाधिक म्हणजेच ५४ इतकी मते मिळाली असल्याने त्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण १ नियम १९ [१] मधील तरतूदीनुसार महापौर पदावर निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

मतदानाद्वारे मंजूर

आयुक्त व पिठासिन अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

(2)

प्रकरण क्रमांक २ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९[१] अन्वये तरतूद केल्याप्रमाणे "उपमहापौर" पदावर अडीच वर्षाकरीता निवड करणे.

---

मिरा-भाईंदर महानगरपालिका ठराव क्रमांक २ दिनांक २८/८/२००२

ठराव :- 2

दिनांक ११ ऑगस्ट २००२ रोजी झालेल्या पहील्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी दिनांक २८/८/२००२ ते २७/२/२००५ या अडीच वर्षाकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९[१] अन्वये "उपमहापौर" या पदावर निवड करावयाची आहे. या निवडणूकीसाठी एकूण ४ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केली होती. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या तारखेस व विहित मुदतीत [१] श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे, [२] श्री. जयंत महादेव पाटील या दोन सदस्यांनी आपली नामनिर्देशन पत्र मागे घेतलेली आहेत. उपमहापौर पदाकरीता अनुक्रमे १] श्रीमती शुभांगी सिताराम नाईक, २] श्री. सय्यद मुझफ्फर हुसेन यांची नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिलेली आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची "उपमहापौर" या पदावर निवड करावयाची असल्याने व एकापेक्षा जास्त उमेदवार उपमहापौर पदासाठी शिल्लक राहिल्याने या नेमणुकीसाठी गुप्त पध्दतीने मतदान घेण्यात आले असता, १] शुभांगी सिताराम नाईक यांना २५ इतकी व २] श्री. सय्यद मुझफ्फर हुसेन यांना सर्वाधिक ५४ मते मिळालेली असल्याने उपमहापौर या पदावर श्री. सय्यद मुझफ्फर हुसेन हे बहुमताने निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

मतदानाद्वारे मंजूर

(sd/-) Mendonca.

महापौर व पिठासिन अधिकारी,
मिरा-भाईंदर महानगरपालिका,

(3)

प्रकरण क्रमांक ३ :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९[१] मध्ये तरतुद केल्याप्रमाणे स्थायी समितीच्या १६ [सोळा] सदस्यांची नेमणुक करणे.

---

मिरा-भाईंदर महानगरपालिका ठराव क्रमांक ३ दिनांक २८/८/२००२

ठराव :- ३

दिनांक ११ ऑगस्ट २००२ रोजी झालेल्या पहिल्या मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपकी मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या एकूण १६ सदस्यांची नेमणुक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम पोटकलम २ अन्वये करणेची आहे. या सदस्यांच्या नेमणुकीसाठी दिनांक २५/८/२००२ रोजी एकूण १९ नामनिर्देशन पत्र दाखल झालेली होती. त्यांपैकी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या तारखेस व विहित मुदतीत एका उमेदवाराने त्यांचे नामनिर्देशनपत्र मागे घेतल्याने एकूण १८ उमेदवार शिल्लक राहिले होते. दि. २८/८/२००२ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेस सुरुवात होण्यापूर्वी १] श्री. अनंत रामचंद्र पाटील व २] श्री. नरेंद्र मेहता या दोन सदस्यांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेत असल्याबाबतचे लेखी पत्र पिठासिन अधिकारी यांना दिल्याने १६ स्थायी समिती सदस्य पदासाठी १६ उमेदवार शिल्लक राहिल्याने पुढील १६ उमेदवारांची स्थायी समिती सदस्य पदावर बिनविरोध निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| | |
|---|---|
| १] अग्रवाल धनराज नंदलाल | २] कुरेशी याकुब इस्माइल |
| ३] कोलासो जेम्स इजिदोर | ४] कोलासो लिओ इजिदोर |
| ५] गावंड हरेश लक्ष्मण | ६] चंद्रकांत सिताराम वैती |
| ७] चौहाण महेंद्रसिंग | ८] तुळशीराम दत्तु म्हात्रे |
| ९] दिनेश द. नलावडे | १०] पाटील अशोक बळवंत |
| ११] पाटील मोहन मधुकर | १२] पाटील शरद केशव |
| १३] भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | १४] म्हात्रे मिलन वसंत |
| १५] शशिकांत रतिलाल शहा | १६] ज्योत्स्ना जालींदर हसनाळे उर्फ पुजा प्रताप शिंदे |

M. Mendonca.
महापौर / पिठासीन अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर

(४)

प्रकरण क्रमांक ४ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण क्र. २ नियम ५ [२] [ब] अन्वये तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १३ डिसेंबर १९९६ नियम ४ अन्वये ५ वर्षाच्या मुदतीकरिता नामनिर्देशित ५ [पाच] पालिका सदस्यांची नेमणुक करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका ठराव क्र. ४ दिनांक २८/८/२००२

ठराव :- ४.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या दिनांक १३ डिसेंबर १९९६ च्या आदेशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर पहिल्या सभेमध्ये पाच नामनिर्देशित सदस्याची नेमणुक करणे आवश्यक आहे.

त्यानुसार या पाच नामनिर्देशित सदस्यांच्या नेमणुकीसाठी अधिनियमांतील तरतुदीनुसार नामनिर्देशित पत्रे मागविली असता, दिनांक २५/८/२००२ रोजी एकुण ८ [आठ] उमेदवारांची नामनिर्देशित पत्रे दाखल झालेली होती.

दिनांक २६/८/२००२ रोजी उमेदवारी मागे घेण्याच्या तारखेत व विहीत वेळेत एका सदस्यानी आपले नामनिर्देशित पत्र आयुक्त तथा प्रभारी अधिकारी सो., यांचेमार्फत मागे घेतल्याने एकुण ७ [सात] उमेदवारांची नामनिर्देशनपत्र शिल्लक राहीली. या उमेदवारांपैकी दिनांक २८/८/२००२ रोजी निवडणुक सभेच्या दिवशी एका उमेदवाराने आपले नामनिर्देशनपत्र मागे घेत असल्याबाबतचे लेखीपत्र पिठासिन अधिकारी सो., यांचे कडे आपली उमेदवारी मागे घेण्याकरीता दिले. यामुळे ६ उमेदवार निवडणुकीसाठी शिल्लक राहिले.

नामनिर्देशित सदस्य म्हणुन ५ सदस्य नेमावयाचे असल्याने आणि जेवढे सदस्य नेमावयाचे आहेत त्यापैकी ६ म्हणजे जास्त उमेदवारांची नामनिर्देशित पत्रे शिल्लक असल्याने या पाच सदस्यांच्या नेमणुकीसाठी अध्यादेशातील नियमानुसार मतदान घेण्यात आले.

सदर अध्यादेशातील नियमानुसार व मते हस्तांतरीत करण्याविषयी जी पध्दत अधिनियमात दर्शविली आहे त्या पध्दतीनुसार मतमोजणी केली असता, खालील पाच सदस्य मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नामनिर्देशित सदस्य म्हणुन निवडून आल्याचे मी जाहीर करीत आहे.

१. श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग
२. श्री. दुबोले प्रकाश शंकर
३. श्री. पागे संजय नारायण
४. श्री. परेरा टेरी पॉल
५. श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र

मतदानाद्वारे मंजूर.

Mendonca.

महापौर/पिठासिन अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका.
भाईंदर.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०९/२००२

**प्रकरण क्र. १ :-** दि. २८/२/२००२ मागील सभेचे इतिवृत्तांत मंजूर करणे.

**ठराव क्र. ५ :-**

दि. २८/०२/२००२ चे मागील इतिवृत्तांतास मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.

ठराव सर्वानुमते मंजुर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०९/२००२

**दुःखवटा ठराव क्र. ६ :-**

भारताचे उपराष्ट्रपती के. कृष्णकांत त्याचप्रमाणे प्राध्यापक कविवर्य वसंत बापट, त्याचप्रमाणे साहित्यकार श्री. शिवाजी सावंत तसेच आपल्या या सभागृहातील जेष्ठ नगरसेवक जयंत पाटील यांच्या मातोश्री अन्नपुर्णा महादेव पाटील भाईंदर पश्चिम परिसरातील जेष्ठ नागरीक भालचंद्र रकवी यांच्या वहिनी हेमलता रकवी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष प्रकाश धुमाळ यांचे पिताश्री श्री. लक्ष्मण धुमाळ या सर्वांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यांत येत आहे. परमेश्वर त्यांच्या मृतात्म्यास चिरःशांती देवो व त्याच्या परिवारावर ओढवलेल्या अकाली दुःखाबद्दल त्यांना दुःख सहन करण्याची शक्ती देवो. सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

**सुचक :- श्री. रोहित सुवर्णा.** **अनुमोदन :- श्रीम. प्रभात पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

## मिरा भाईंदर महानगरपालिका.

(६)

मा. महासभा दि. १९. ९. २००२ ची तहकुब सभा दि. ५. १०. २००२ ठराव क्र. ७ ची प्रत.

विषय २ :- महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळेतील विदयार्थ्यांना सहामाही परीक्षा-२००२ तसेच वार्षिक परीक्षा-२००३. च्या परीक्षेस लागणा-या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तसेच इतर आवश्यक साहित्य छपाई करुन घेणेबाबत...

ठराव क्र. ७

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या एकूण २९ विविध प्राथमिक माध्यमाच्या शाळा असून महानगरपालिका शाळेत शिक्षण घेणारे बहुसंख्य विदयार्थी हे गोरगरीब व आर्थिकदृष्टया कमकुवत गटातील असल्याने सर्व विदयार्थ्यांना सालाबादप्रमाणे सहामाही परीक्षा-२००२ तसेच वार्षिक परीक्षा-२००३ परीक्षे करिता प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व इतर आवश्यक साहित्य छपाई करुन मोफत देण्यांत येतात. त्याप्रमाणे सहामाही परीक्षा-२००२ तसेच वार्षिक परीक्षा-२००३ मध्ये होणा-या परीक्षे करिता खालील इयत्ते प्रमाणे प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व पुरवण्या इत्यादी साहित्य छपाई करुन घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | इयत्ता | विषय | सदरचे प्रति/नग फक्त एका परीक्षेकरिता रहातील. | |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | |
| १] | इ. १ ली ते इ. ५ वी | :- प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका पाठपोठ [ २ पानी] | ३७५०० | नग |
| २] | इ. ६ वी ते इ. ७ वी | :- उत्तरपत्रिका पाठपोठ [ १२ पानी] | १९००० | नग |
| ३] | पुरवण्या | :- उत्तरपत्रिका [ ४ पानी ] | ५००० | नग |

वरील प्रमाणे परीक्षेसाठी साहित्य छपाई करण्यासाठी येणारा खर्च हा महानगरपालिका फंडातून करावयाचा असून सहामाही परीक्षा-२००२ तसेच वार्षिक परीक्षा-२००३ परीक्षेसाठी लागणारे साहित्य छपाई करुन घेण्यासाठी अंदाजे ३,००,०००/-इतका खर्च अपेक्षित आहे. व सन २००२-२००३ या वर्षातील अंदाजपत्रक तरतुद रु. ३,००,०००/- इतकी करण्यांत आलेली आहे. त्यामुळे सदरचे काम करुन घेण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन जाहिर टेंडर नोटीसीव्दारे निविदा मागवून प्राप्त निविदाव्दारे कमी दराच्या निविदा, निविदा धारकां कडून परीक्षेकरिता लागणा-या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तसेच इतर आवश्यक साहित्य छपाई करणेस येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- हेरल्ड बोर्जिस (सही)
अनुमोदन :- चंद्रकांत वैती (सही)
ठराव सर्वानुमते मंजूर.

(सही)
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका.

मा. महासभा दि. १९. ९. २००२ ची तहकुब सभा दि. ५. १०. २००२ ठराव क्र. चीप्रत.

विषय :- २ शिक्षण उत्तेजक मंडळ, घोडबंदर या संस्थेचे शाळागृह भाडे अदा करणे बाबत...

ठराव क्र. ८

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महानगरपालिका प्राथमिक शाळांचे नव्याने बांधकाम केले असल्याने सदरच्या पूर्वीच्या शाळा तोडण्यात आल्या होत्या. महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ९, घोडबंदर नविन बांधकाम करणेसाठी तोडल्यानंनंतर सदरचे विद्यार्थी घोडबंदर राजा शिवाजी विद्यालय या शिक्षण उत्तेजक मंडळ, घोडबंदर संस्थेच्या शाळेमध्ये आठ वर्ग खोल्यामध्ये दुबार पध्दतीने शाळा भरविण्यांत येत होती.

मिरा भाईंदर महानगरपालिका बांधकाम विभाग अभियंता यांचेकडून प्रति वर्ग खोली मासिक भाडे रु. ५००/- ठरविण्यांत आले होते. व तत्कालीन सर्व साधारण सभेने त्यास ठराव क्र. २५८ दि. ३. ११. ९९ नुसार मंजूरी दिलेली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ९, घोडबंदर चे विदयार्थी सध्या माहे-जानेवारी - २००२ पासून नविन महानगरपालिका इमारती मध्ये बसत असल्याने शिक्षण उत्तेजक मंडळ, घोडबंदर या संस्थेने माहे- एप्रिल-२००१ ते डिसेंबर-२००१ पर्यंतचे प्रति-महिना रु. ४,०००/- नुसार ९ महिन्याचे रु. ३६,०००/- भाडे मागणी केली आहे. सन-२००२-२००३ अंदाजपत्रकांत ड [३] [१३] नुसार रु. ५ लाख तरतुद आहे. त्यानुसार भाडे-प्रदान करणेस येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- कुंदरीबाबु शर्मा

अनुमोदन :- कुलकिशोर पाठे

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

(e)

# मिरा भाईंदर महानगरपालिका.

## मा. महासभा दिनांक ५/१०/2002

प्रकरण क्र. ०४ :- मनपा. क्षेत्रात डंपिंगग्राऊंडवर जमा होणा-या कच-यावर प्रक्रीया करुन त्याचा पुर्नवापर करणे कामाचा प्रकल्प उभारणे कामाचा अहवाल तयार करणे कामाच्या निविदा मागविणे बाबत.

ठराव क्र. :- e

महानगरपालिका क्षेत्रात दररोज १० डंपर, ०३ टेम्पो, ०३ ट्रॅक्टर, ०४ ट्रॉल्या, आदी वाहनामार्फत शहरातील दैनंदिन कचरा गोळा करुन भाईंदर [पुर्व] नवघर येथील डंपींगग्राऊंडवर टाकला जातो. सदर कच-यामध्ये घरातुन निघणारा कचरा, औद्योगिक वसाहती मधून निघणारा कचरा, प्लास्टीक, आदींचा समावेश असतो.

महानगरपालिका क्षेत्रालगत असलेल्या महानगरपालिकां मध्ये सध्या कच-याचे वर्गीकरण करुन त्यामधून औद्योगिक वसाहती मधून जमा होणारा कचरा प्लास्टीक, बांधकाम साहित्य व विघटन होणारा कचरा असे केले जाते. विघटन होणा-या कच-यावर प्रक्रीया करुन त्यापासून खत निर्मितीचे प्रकल्प सुरु आहेत. सदरचे खत विकून त्यापासून मिळणा-या उत्पान्नातुन संबंधीत मनपा.स रॉयल्टी दिली जाते. जमा होणा-या कच-याचे वर्गीकरण करुन त्यावर प्रक्रीया केल्या डंपींगग्राऊंडच्या जागेसंबंधीतील समस्या काही प्रमाणात कमी होईल.

तरी महानगरपालिका क्षेत्रात डंपींगग्राऊंडवर जमा होणा-या कच-यावर प्रक्रीया करुन त्याचा पुर्नवापर करणे कामाचा प्रकल्प उभारणेचा अहवाल तयार करणे कामाच्या निविदा मागविणेस व यासाठी वेळोवेळी होणा-या खर्चास हि महासभा मंजूरी देत आहे.

सूचक :- महेंद्रसिंग चौहाण      अनुमोदन :- चंद्रकांत मोदी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/१०/२००२

**प्रकरण क्र. ५ :-** **महानगरपालिकेकरिता जकात किंवा उपकर लागू करणे बाबत निर्णय घेऊन मंजुरी करिता शांसनास प्रस्ताव पाठविणे.**

**ठराव क्र. १० :-**

राज्यामधील नगरपरिषदांमध्ये जकात कराची वसुली दि. १ मे १९९९ पासून बंद करण्यांत आलेली आहे. शासन जकात नुकसान भरपाईपोटी नगरपरिषदांना अनुदानाचे वितरण चार वर्षापर्यंत करणार असून सन २००२-०३ हे शेवटचे वर्ष असून त्यापुढे उत्पन्नाचा स्त्रोत नगरपरिषदांनी स्वतः शोधायचा आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका दि. २८/०२/२००२ पासून अस्तित्वात आल्याने महानगरपालिकेस जकात कर / उपकर लावता येईल.

सध्या महापालिकेतील व्यापार उद्योग धंदे याबाबतची सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. त्या चौकशी आधारे महानगरपालिकेस उपकर अथवा जकात लावून वसुली करणे सुलभ होईल. दोन्ही पर्यायापैकी कोणता पर्याय महानगरपालिकेस फायदेशीर ठरेल याबाबतचा विचार करणेकरिता खालील सदस्यांची समिती नेमून त्यांनी त्यांचा अहवाल येत्या दोन महिन्यात महासभेपुढे सादर करणेस हि महासभा मंजुरी देत आहे.

**समिती सदस्य :-**

१) मा. महापौर, मि.भा.म.न.पा.

२) मा. उपमहापौर, मि.भा.म.न.पा.

३) मा. सभापती, स्थायी समिती, मि.भा.म.न.पा.

४) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका

५) मा. विक्रीकर आयुक्त - तज्ञ

६) मा. उपकर अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय क्र.: ६ मा.महासभा दि.१९/९/२००२ ५/१०/

भूयारी गटाराचे सर्वेक्षण करणेकामी एजन्सी नेमून अहवाल मागविणे

ठराव क्र. ११

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे ७९.४० चौ.कि.मी. एवढे असून दहिसर चेक नाका ते वर्सोवा ब्रीज व काजूपाडा ते उत्तन असा पसरलेला आहे. शहरामध्ये सांडपाणी वाहण्याकरिता गटारे, नाले (उघडी) बांधण्यात आलेली असून शांतीनगर, शांतीपार्क, जेसलपार्क भागात भूयारी गटारे आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे खाडीलगत आहे. शहरामध्ये भूयारी गटारे योजना प्रस्तावित करावयाची असून सदर योजनेकरिता विभागवार सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. तरी सदर सर्व्हे व अहवाल नामांकित /अनुभवी एजन्सीकडून करुन घेण्यास व येणा-या खर्चास मंजूरी देत आहे.

सूचक :- श्री. लिओ कोलासो अनुमोदक :- श्रीम. गीता जैन.

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/१०/२००२

**प्रकरण क्र. ७ :-** **दि. ८/१/२००२ रोजीच्या महाराष्ट्र राज्य शासनाचा वटहुकूमाचे (असाधारण राजपत्र) सदस्याचे माहितीकरिता वाचन करणे.**

**ठराव क्र. १२ :-**

वरील प्रकरण क्र. ७ ची असाधारण राजपत्राची प्रत सर्वांना देण्यांत आलेली आहे. त्याचे सर्वांनी वाचन केलेले आहे व त्या पत्रातील माहिती आम्हांला मिळालेली आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत शहा.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०५/१०/२००२

**ठराव क्र. १२ अ :-**

या सभागृहाचे नगरसेवक श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स यांच्या मातोश्री ॲनी जोसेफ रॉड्रीक्स तसेच सन्माननीय नगरसेवक श्री. गजानन भोईर यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई भोईर यांना दि. २९/९/२००२ रोजी देवाज्ञा झाली तसेच सन्माननीय नगरसेविका श्रीमती जोत्स्ना हंसनाळे यांच्या सासुबाई लक्ष्मीबाई बळीराम शिंदे यांना दि. १/१०/२००२ रोजी देवाज्ञा झाली तरी त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती व सद्‌गती तसेच गुजरात राज्यातील गांधीनगर येथील अक्षरधाम स्वामीनारायण मंदीरामध्ये आरतीच्या वेळी अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्यामध्ये मृत पावलेल्या भावीकांच्या पवित्र आत्म्यास सभागृह श्रद्धांजली वाहून हल्ल्याचा निषेध करीत आहे. कृपया सर्वांनी श्रद्धांजली वाहण्याकरीता दोन मिनीटे स्तब्ध उभे रहायचे आहे.

**सुचक :- श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर.** **अनुमोदन :- श्री. शरद केशव पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००२

**प्रकरण क्र. ८ :-** दि. १९/९/२००२ तहकुब झालेल्या सभेचे तसेच दि. ५/१०/२००२ रोजीच्या महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १३ :-**

दि. १९/०९/२००२ तसेच दि. ५/१०/२००२ च्या महासभेचे इतिवृत्तांत कायम करणेंस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत शहा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

(१५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दिनांक १९/१०/२००२ सकाळी ११.०० वाजता

विषय क्र.९ निवडून आलेल्या सदस्यांना द्यावयाचे मानधन व भत्ता निश्चित करणे बाबत..

ठराव क्र. १४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि.२८/२/२००२ रोजी झाली असून पहिली सार्वत्रिक निवडणूक दि.११/८/२००२ रोजी झालेली असून पहिली नवनिर्वाचित बॉडी अस्तित्वात आलेली आहे. शासन निर्णय क्र.संकिर्ण-१०/२००१/ प्रक्र.१२५/नवि-२७, दि.१६/८/२००१ नुसार प्रत्येक नगरसेवकांना त्यांचे दैनंदिन पत्रव्यवहाराकरिता लेखन सामुग्री दूरध्वनी इत्यादी कामी रु.3000/- मानधन देण्याची तरतूद आहे. तसेच मासीक सभा भत्ता किमान रु.१००/- व कमाल रु.४००/- देण्याची तरतूद आहे. तरी प्रती माह रु.३०००/- मानधन व प्रतिसभा रु.१००/- भत्ता देण्याकरिता महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

तसेच शासन निर्णय क्र.एमएमसी-१२९७/८५५/प्रक्र.६३/नवि-२४, दि. २० जून २००१ अन्वये रु.१००/- कोटो रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या महानगरपालिकेच्या महापौर यांना प्रतिवर्षी रु.६०,०००/- अतिथ्य भत्ता देण्याची तरतूद आहे. तरी प्रतिवर्षी रु.६०,०००/- इतका महापौर यांना अतिथ्य भत्ता देण्याकरिता महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी ही महासभा देत आहे.

सुचक :- आसिफ शेख ९ē

अनुमोदक :- चंद्रकांत वैती

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००२

(१६)

**विषय :७० मा. सभापती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता यांचेसाठी तीन नविन ॲम्बेसिडर वाहने खरेदी केल्याबाबत अवलोकनार्थ सादर.**

**ठराव क्रमांक :-** १५

महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागासाठी मा. सभापती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता साहेब यांना तीन नविन ॲम्बेसिडर खरेदी करणेसाठी मा. आयुक्त यांनी सुचित केल्याप्रमाणे मा. सभापती, मा. विरोधी पक्ष नेता, मा. सभागृह नेता ठिकठिकाणी जाऊन विकास कामाची पहाणी करता येईल यासाठी वाहनांची निकड लक्षात घेता तीन नविन ॲम्बेसिडर खरेदी करणेसाठी मा. प्रशासकीय ठराव क्र. १८६, दि. २६-८-२००२ अन्वये मे. दि. नॅशनल गॅरेज लिमिटेड यांचेकडुन थेट खरेदी करणेसाठी मंजूरी देणेत आली आहे. त्याचप्रमाणे मे. दि. नॅशनल गॅरेज लिमिटेड, मुंबई अधिकृत विक्रेत्याकडुन ॲम्बेसिडर पेट्रोल १८ आयएसझेड, बीईअेसी (ईयूआओ) १८०० सी.सी. इंजिन या तपशिलानुसार दि. २४-८-२००२ रोजीचं एका वाहनाचे दरपत्रकामधील किंमत रू. ४,५४,८५६/- (अक्षरी रू. चार लाख चौपन्न हजार आठशे छपन्न मात्र) इतकी आहे. त्याप्रमाणे तीन ॲम्बेसिडरची एकूण किंमत रू. १३,६४,५६८/- (अक्षरी रू. तेरा लाख चौषष्ठ हजार पाचशे अडुसष्ठ मात्र)

महानगरपालिकेने मा. सभापती, मा. विरोधी पक्षनेता, सभागृह नेता यांचेकरिता तीन नविन ॲम्बेसिडर थेट उत्पादक कंपनीच्या अधिकृत विक्रेता मे. दि. नॅशनल गॅरेज लि. यांचेकडुन खरेदी करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ नुसार प्रशासकीय मंजूरी घेऊन खरेदी करणेस आलेले आहे.

सदरकामाचे ही सभा अवलोकन करून मंजूरी देत आहे.

सूचक हॅरल्ड बोर्जीस (signature)

अनुमोदक गीता जैन (signature)

ठराव सर्वानुमते मंजूर

(signature)

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका.

(९८)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१० /२००२

**प्रकरण क्र.** ११ **नवनिर्वाचीत महापौर, उपमहापौर व सर्व महानगरपालिका सदस्यांचे लेटरपॅड, व्हिजीटींग कार्ड व इनव्हलप छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे**

ठराव क्र. १६.

महानगरपालिका नवनिर्वाचीत मा. महापौर, उपमहापौर व सर्व सदस्यांकडुन लेटरपॅड, व्हिजीटींग कार्ड व इनव्हलप छपाई करून मिळणेबाबत मागणी केली जात आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे लेटरपॅड, व्हिजीटींग कार्ड व इनव्हलप छपाई करून घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | | तपशिल | |
|---|---|---|---|
| १. | मा. महापौर सो. | लेटरपॅड सा. १/४ (मराठी व इंग्रजी) | प्रत्येकी १००० प्रति |
| | | लेटरपॅड सा. १/८ (मराठी व इंग्रजी) | प्रत्येकी १००० प्रति |
| | | व्हिजीटींग कार्ड अमेरिकन साईज (मराठी व इंग्रजी) | प्रत्येकी १००० प्रति |
| | | इनव्हलप सा. ११" X ५" (मराठी व इंग्रजी) | प्रत्येकी १००० प्रति |
| | | इनव्हलप सा. ९" X ४" (मराठी व इंग्रजी) | प्रत्येकी १००० प्रति |
| २. | मा. उपमहापौर सो. | वरीलप्रमाणे | |
| ३. | मा. सभापती, स्थायी समिती सो. | वरीलप्रमाणे | |
| ४. | मा. सभागृह नेता सो | वरीलप्रमाणे | |
| ५. | मा. विरोधी पक्ष नेता सो. | वरीलप्रमाणे | |
| ६. | मा. महानगरपालिका सदस्य | लेटरपॅड सा. १/४ (मराठी) | प्रत्येकी ५०० प्रति |
| | | व्हिजीटींग कार्ड अमेरिकन सा. (मराठी) | प्रत्येकी ५०० प्रति |
| ७. | | इनव्हलप | प्रत्येकी ५०० प्रति. |

वरीलप्रमाणे चार रंगामध्ये (स्क्रिन प्रिंटींग) छपाई करून घेणेस अंदाजित रक्कम रू. १,८६,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी **"सामान्य प्रशासन-स्टेशनरी"** या शिर्षकाखाली रक्कम रू. ८,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे.

तरी लेटरपॅड, व्हिजीटींग कार्ड व इनव्हलप छपाई करून घेणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक** नितीन ठाकुर [signature]

**अनुमोदन** शानु गोहील [signature]

**ठराव सर्वानुमते मंजूर**

[signature]
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

(७) लोटे / नगरसचिव

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/१०/2002.

प्रकरण कं. १२ महानगरपालिका सभागृह वार्ताहर कक्षाकरिता खुर्च्या खरेदी करणेस व त्याकामी
ठराव कं. १६० येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे

महानगरपालिका सभागृह–वार्ताहर कक्षाकरिता महासभा चालू असताना बसण्याकरिता पत्रकारांनी फळी असलेल्या खुर्च्यांची मागणी केलेली आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे खुर्च्या खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ. क. | तपशील | परिमाण |
|---|---|---|
| 1. | लोखंडी ॲंगल फायवर कव्हर<br>साईज– उंची 32" **X** रूंदी 21" **X** लांबी 15"<br>टॉप साईज लाकडी फ्रेम लांबी 19" **X 8 1/2** | 30 नग |

वरीलप्रमाणे खुर्च्या खरेदी करणेस अंदाजित रक्कम रू. 20,000/– इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात " सामान्य प्रशासन – सर्व विभाग फर्निचर देखभाल दुरूस्ती " या शिर्षकाखाली रक्कम रू. 3,00,000/– इतकी तरतूद केलेली आहे. तरी महानगरपालिका सभागृह–वार्ताहर कक्षाकरिता खुर्च्या खरेदी करणेस तसेच मा. महापौर सो. हयांची खुर्ची तसेच राजदंड हयाचा होणारा खर्चसुध्दा करणेस व त्याकामी येणा–या खर्चास हि सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 प्रकरण 5 नुसार आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक ........ हेरल्ड बोर्जीस - HBorges
अनुमोदक ........ शानु गोहिल - ShanuGohil

ठराव सर्वानुमते मंजूर

(सही)
महापौर
मिरा–भाईंदर महानगरपालिका.

(१८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/१०/२००२.

विषय क्र. १३ :- कचरा वाहतुकीकरीता नवीन ~~चार~~ सहा टेंपो खरेदी करणे.

ठराव क्र. १८

महानगरपालिका क्षेत्रातील निघणारा दैनंदिन कचरा घंटागाडी मार्फत प्रमुख रस्त्यावरुन तसेच ज्या ठिकाणी वाहन जाऊ शकते अशा ठिकाणाहून थेट कचरा गोळा करण्यांत येत आहे व सदरची मोहिम सद्या यशस्वीरित्या पार पाडली जात आहे. यासाठी नागरीकांचे सहकार्य ही मोठ्या प्रमाणावर लाभले आहे. मात्र शहरातील भाईंदर (पूर्व), भाईंदर (पश्चिम), काशिमिरा, राई मुर्धे ते उत्तन व औद्योगिक परिसरात अतिशय अरुंद रस्ते, गल्ल्या बोळ असल्यामुळे त्या ठिकाणी मनपाचे मोठे वाहन घेऊन जाणे अशक्य होत आहे. परिणामी त्या भागातील कचरा उचलण्यांस सद्या अडचण निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे शहरातील बहुतांशी गटारे हि उघडया स्वरुपाची असल्यामुळे गटार सफाई कामा मधून निघणारा गाळ, कचरा, तसेच रस्त्यावरील झाडू सफाई कामामधून निघणारा कचरा सध्या मनपाने कचराकुंडी पद्धत बंद केल्यामुळे सदरचा कचरा व गटर, गाळ/माती मजूरांना एक ते दिड किलोमीटर दूर अंतरापर्यंत दोनचाकी हातगाडयांव्दारे वाहतूक करावी लागत आहे.

करीता सफाई कामगारांचे श्रम व वेळ या पध्दतीने वाया जात असल्याने ते टाळण्याकरीता चारचाकी मिनी डंपर ~~चार~~ सहा नग (टाटा ४०७ मॉडेलचे) व दोन नग ~~तीनचाकी रिक्षा टेम्पो~~ (माल वाहतुक करणारे) ही वाहने थेट उत्पादक कंपनी किंवा कंपनीने नेमलेल्या अधिकृत विक्रेत्यांकडून शासकिय दराने खरेदी करणेंस तसेच सदर गाड्यांवर हाड्रोलिक पद्धतीने बॉडीची बांधणी करणे आदी कामाच्या निविदा मागवून खरेदी करणे ~~या कामी येणाऱ्या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.~~ तसेच मुर्धा/राई/मोर्वा/डोंगरी/उत्तन/पाली/चौक त्या ग्रामीण भागात ~~[illegible]~~ औषध फवारणीची गाडी अत्यंत मोठी असल्यामुळे सदर भागात औषध फवारणीसाठी एकंदर ८ ~~[illegible]~~ हॅन्ड फोग मशीन खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक : जेन्वी आल्मेडा [signature]

अनुमोदन : ~~[illegible]~~ परशुराम पाटील [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००२

**प्रकरण क्र. १४ :-** **नवघर, गोडदेव स्मशानभूमी खाजगी संस्थेस विकसित करणेकामी देणेबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र. १९ :-**

नवघर, गोडदेव स्मशानभूमी यापुर्वी इतर खाजगी संस्थंस विकसित करण्याकरिता करारनामे करुन दिली असल्यास तशी माहिती घेण्यांत यावी व सदर संस्थेशी करारनामे झाले असल्यास त्यांना तीन महिने मुदत देऊन काम करण्यांस सांगण्यांत यावे. सदर मुदतीत सदर संस्थेनी विकासाची कामे न केल्यास इतर मंडळ/संस्था तयार असल्यास तशी माहिती सभागृहापुढे ठेवण्यांत यावी.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

(23)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००२

**प्रकरण क्र. १५ :-** **महानगरपालिकेची १० वर्षे पूर्ण झालेली व निरूपयोगी वाहने निर्लेखित करून लिलावाद्वारे विक्री करणेबाबत.**

**ठराव क्रमांक :-** 20

महानगरपालिकेकडे १० वर्षे पूर्ण झालेली बरीच वाहने आहेत. सदरची वाहने वारंवार नादूरूस्त होत असल्याने ती वापरणे किफायतशीर नाही. सदरची वाहने निर्लेखित करणेबाबत शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक विअप्र-१०९१/प्र.क्र.१२/विनियम, दि. १ ऑक्टोबर १९९१ नुसार अटींबाबत मार्गदर्शन केलेले आहे. तसेच महानगरपालिककडे १० वर्षे पूर्ण न झालेली काही वाहने वारंवार नादूरूस्त होत असतात व त्यांच्या दुरूस्तीवर मोठ्या प्रमाणात खर्च करूनही ती परत बंद पडतात. त्यामूळे सदरची वाहने निरूपयोगी झालेली आहेत.

१० वर्षे पूर्ण झालेली व निरूपयोगी झालेली वाहने निर्लेखित करून लिलावाद्वारे विक्री करणेबाबत एकूण १५ वाहनांची तपासणी करून त्यांची स्थिती व किंमत ठरवून देणेबाबत जा. क्र. मनपा/वाहन/१४/४४६/२००२-२००३ दि. ११/४/२००२ अन्वये मा. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांना विनंती केली होती. त्यानुसार त्यांनी वाहनांची तपासणी करून बाजारभावाप्रमाणे हातची किंमत व यांत्रीक स्थिती याबाबत दि. १८/४/२००२ रोजीचे पत्र दि. २२/८/२००२ रोजी महानगरपालिकेत दिलेले आहे. मा. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांचे पत्रानूसार खालील वाहने निर्लेखित करून त्यांची लिलावाद्वारे विक्री करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन क्रमांक | खरेदी वर्ष | हातची किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | टाटा १२१० (फायर फायटर) | एम.सी.वाय.-५९८ | १९८७ | रू. १४००००/- ते रू. १४५०००/- | सध्या चालू |
| २. | महिन्द्रा & महिन्द्रा जीप | एम.जी. आर. - ९६०० | १९८८ | रू. ३५०००/- ते रू. ४००००/- | बंद |
| ३. | मारूती जीप्सी | एम. एच.०४ - ए. २४५५ | १९९० | रू. ४००००/- ते रू. ४५०००/- | बंद |
| ४. | हिंदुस्थान नोवा सलोन अॅम्बेसिडर | एम.एच.०४ - ए. ४०७० | १९९१ | रू. १८०००/- रू. २३०००/- | बंद |
| ~~५.~~ | ~~कॉन्टेसा सलोन कार~~ | ~~एम.एच.०४ - एन. ४४०१~~ | ~~१९९४~~ | ~~तपासणीस उपलब्ध नाही~~ | ~~मा. जिल्हाधिकारी यांचेकडे~~ |
| ६. | महिन्द्रा & महिन्द्रा ट्रॅक्टर | एम.एच.०४ - बी. ८१ | १९९० | रू. २८०००/- ते रू. ३००००/- | बंद |
| ७. | महिन्द्रा & महिन्द्रा ट्रॅक्टर | एम.एच.०४ - बी. १६३ | १९९१ | रू. ३००००/- ते रू. ३२०००/- | सध्या चालू |

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन क्रमांक | खरेदी वर्ष | हातची किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ८. | महिन्द्रा & महिन्द्रा ट्रॅक्टर | एम.एच.०४ - बी. १६४ | १९९१ | रू. ३००००/- ते रू. ३२०००/- | सध्या चालू |
| ९. | महिन्द्रा & महिन्द्रा ट्रॅक्टर | एम.जी.आर, - ७४८८ | १९८८ | रू. २८०००/- ते रू. ३००००/- | बंद |
| १०. | महिन्द्रा & महिन्द्रा ट्रॅक्टर | एम.जी.आर, - ७४८९ | १९८८ | रू. २६०००/- ते रू. २८०००/- | बंद |
| ११. | महिन्द्रा & महिन्द्रा ट्रॅक्टर | एम.जी.आर, - ३९७१ | १९८७ | रू. २६०००/- ते रू. २८०००/- | बंद |
| १२. | महिन्द्रा & महिन्द्रा ट्रॅक्टर | एम.जी.आर, - ३९७४ | १९८७ | रू. २६०००/- ते रू. २८०००/- | बंद |
| १३. | ~~गुजरात ट्रॅक्टर कार्पो. लि. डोझर~~ | ~~एम.एच. ०४ - बी ३८८~~ | ~~१९९५~~ | ~~रू. १५००००/- ते रू. १६००००/-~~ | ~~बंद~~ |
| १४. | बजाज मेटाडोर एफ-३०५ (ॲम्ब्युलन्स) | एम.सी.वाय - ४५३१ | १९८९ | रू. २८०००/- ते रू. ३००००/- | बंद |
| १५. | ~~लार्सन ॲन्ड टुब्रो ५८०/२ लोडर बॅकहो जे.सी.बी.~~ | ~~एम.एच.०४ - ई. ४२१६~~ | ~~१९९७~~ | ~~रू. ६०००००/- ते रू. ६५००००/-~~ | ~~बंद~~ |

**सर्व वाहनांची एकूण हातची किंमच रू. १२०५०००/- ते १३०१०००/-**

तरी वरील वाहने निर्लेखित करून लिलावाद्वारे त्यांची विक्री करणेस मा. महासभेची मंजूरी देणेस येत आहे.

सूचक ______ हेलन गोविंद

अनुमोदक ______ दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका.

5341688

(24)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/१०/२००२.

विषय क्र. १६ :- ठेका पद्धतीने वाहनचालक व सर्व्हेअर घेण्याबाबत.

ठराव क्र. 29

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील डंपर, टेम्पो आदी वाहनामार्फत घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यांत येत आहे. सदरची मोहिम सद्या यशस्वी रित्या एक पाळीमध्ये राबविण्यांत येत आहे. सदरची मोहित अधिक कार्यक्षम करण्यासाठी शहरातील कचरा दोन पाळ्यांमध्ये वाहतूक करणे गरजेचे आहे. मात्र सध्या आरोग्य विभागाकडे असलेली वाहने व वाहन चालक यांचे प्रमाण विसंगत असल्यामुळे कचरा वाहतूकीचे काम प्रभाविरित्या करणे शक्य होत नाही.

वरील बाबत सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहनांची संख्या | १ली पाळी वाहनचालक संख्या |
|---|---|---|---|
| १) | डंपर | १० नग | १० |
| २) | टेम्पो | ०३ नग | ०३ |
| ३) | ट्रॅक्टर | ०७ नग | ०३ |
| ४) | धुरफवारणी गाडी | ०१ नग | -- |
| ५) | संक्शन मशीन | ०१ नग | ०१ |
| ६) | जेटींग मशीन | ०२ नग | -- |
| | | २४ नग | १७ |

वरील वाहनांची व वाहन चालकांची संख्यांचे अवलोकन केल्यास वाहन चालक कमी असल्याचे दिसून येते. तसेच उपलब्ध असलेल्या वाहनचालकाकडून सध्या सतत सातही दिवस कचरा वाहतूकीचे काम करुन घेण्यांत येत आहे. त्यामुळे सदरचे वाहनचालक हे कामाच्या तणावामुळे आजारी पडतात किंवा रजा घेतात. त्यामुळे दैनंदिन कचरा वाहतूकीच्या कामात अडचणी येत आहेत. त्यामुळे नागरीकांच्या कचरा वाहतूक गाडी न येण्याबाबतच्या तक्रारी या कार्यालयाकडे येत असतात.

वरील सर्व बाबी विचारात घेता व सध्या मनपाच्या आस्थापनेवर वाहनचालक उपलब्ध होत नसल्यामुळे त्याचप्रमाणे कचरा वाहतूकीची कामे दोन पाळीमध्ये करण्यासाठी तसेच प्रत्येक वाहन चालकास आठवड्याची सुट्टी (एक दिवस) देण्या कामी ठेकापद्धतीने वाहन चालक उपलब्ध करणे अतिशय गरजेचे आहे.

तरी शहरातील दैनंदिन कचरा डंपिंग ग्राऊंड येथे वेळोवेळी व समाधानकारक रित्या वाहतूक करणेकरीता आरोग्य विभागातील कचरा वाहतूक वाहने दोन पाळ्यांमध्ये चालविणे कामी निविदा मागवून ठेका पद्धतीने २० वाहन चालक घेणे तसेच या पुढेही आरोग्य विभागाकरीता कचरा वाहतूक कामी नव्याने लहान आकाराची वाहने घेण्यात येणार आहेत. सदर वाहनावर ठेका पद्धतीने वाहन चालक घेणे व या कामाकरीता येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे. परंतु वाहनचालकाच्या १० वाहनांचे अनुभव (लाइसन्स) आवश्यक

तसेच महानगरपालिकेच्या शाळा, इमारती, मार्केट, महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या आरक्षित जागा, मिठागरे इत्यादींचे सर्वेक्षण करणे कामी ठेका पद्धतीने सव्हेअर घेणे व या कामास येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशाकीय मंजुरी देत आहे.

सुचक : रविंद्र माळी अनुमोदन : प्रेमनाथ पाटील

Rmeeli

ठराव सर्वानुमते मंजुर

Mendonca
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

(२८)

(२५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका.

## "मा. महासभा दि. १९/०९/०२."

विषय :- १७ **महानगरपालिका बालवाडीमधील विद्यार्थ्यांना २००२-२००३ या सालासाठी "सकस आहार" पुरवठा करणेकामी मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र.** 22

महानगरपालिकेच्या एकूण २५ (२४) बालवाडया सुरू आहेत. सदर बालवाडया मधून १७०० शिक्षण घेत आहेत. सदरचे विद्यार्थी झोपडपट्टी व आर्थिकदृष्टया कमकुवत वर्गातील आहेत. झोपडपट्टयामध्ये पुर्वप्रथामिक शिक्षणाचा प्रसार होणेच्यादृष्टोने व मुलांना शाळेत जाण्याची सवय लागवी यासाठी बालवाडयातील मुलांना **"सकस आहार"** देणे गरजेचे असून त्यामुळे मुलांच्या उपस्थितीत वाढ होईल. बालवाडयामधील मुलांना आठवडयाचे सहा दिवस (रजा वगळता) खालील प्रमाणे **"सकस आहार"** दयावयाचा आहे.

| अ.क्र. | तपशिल | प्रत्येक विद्यार्थी दयावयाचे परीमाण. |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १) | मोड आलेली कडधान्य (मसाल्यमध्ये तयार केलेली) | १०० ग्रॅम |
| २) | शेंगदाणे व गुळ | १०० व ५० ग्रॅम |
| ३) | फुटाणे | १०० ग्रॅम |
| ४) | अंडी (उकडलेले) | १ नग |
| ५) | बिस्कीट (मारी) | ४ नग |
| ६२ | [illegible] | २०७१ |

वरील प्रमाणे **"सकस आहार"** दिल्यास मुलांची मानसिक व शारीरीक तंदुरूस्तीत वाढ होईल.

महिला व बालकल्याणासठी सन २००२-२००३ या सालासाठी रू.८७.००/- लाख एवढी तरतुद आहे. **"सकस आहार"** पुरवठा करण्यासाठी अंदाजित रू. १५ लाख एवढा खर्च होणार आहे. करीता **"सकस आहार"** पुरवठा करणेस येणाऱ्या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- सुरेखा गायकवाड S. Y. Gaikwad

अनुमोदन :- ज्युडी डिसोझा

ठराव सर्वानुमते मंजूर. [signature]

[signature] महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१९/१०/२००२

विषय क्र.१८ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुलभ शौचालये बांधणे बाबत विचार विनिमय करणे .

ठराव क्रमांक :- 23

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध भागात आवश्यकतेनुसार महानगरपालिकेने शौचालये, मुता-या बांधलेली आहेत. सदर शौचालयाची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. तसेच महानगरपालिकेने **बांधा व वापरा** तत्वावर मिरा रोड रीक्षा स्टॅंड येथे सुलभ शौचालयाचे बांधकाम पूर्ण केलेले असून राष्ट्रीय महामार्ग क्र.८ जवळ दहिसर चेकनाका जवळ सुलभ शौचालयाचे काम अतीम टप्प्यात आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध भागांत **बांधा व वापरा** तत्वावर सुलभ शौचालय बांधणेकामी अनेक खाजगी, सेवाभावी संस्थांचे अर्ज आलेले असून त्यांनी विविध ठिकाणी महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार **बांधा व वापरा** तत्वावर सुलभ शौचालये बांधण्याची तयारी दर्शविलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या निवडून आलेल्या सदस्यानी सुध्दा त्यांच्या प्रभागात नविन सुलभ शौचालये बांधण्याची मागणी केलेली आहे.

तरी महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार सदर इच्छूक संस्थांना सुलभ शौचालये बांधण्याची कामे बांधा व वापरा या तत्वावर दिल्यास महानगरपालिकेच्या निधीची बचत होणार असून देखभाल व दुरुस्ती सदर संस्था करणार असल्याने सदर निधीचीही बचत होणार आहे. बाथरुम करिता रु.२.०० प्रती माणसी व शौचालयाकरिता रु.१.०० प्रती माणसी हा दर राहणार आहे.याच तत्वावर महानगरपालिकची विविध भागात असलेली शौचालये खाजगी संस्थांना **पैसे दया वापरा** दिल्यास महानगरपालिकेच्या निधीची बचत होणार आहे. महानगरपालिकेस शौचालये दुरुस्ती कामी वार्षिक रु. १०.०० लक्ष एवढा खर्च येत असून साफसफाई करीता कर्मचा-यांवर सुमारे रु.१५.०० लक्ष एवढा खर्च होत असतो. सदर अस्तित्वात असलेली शौचालये सुध्दा **पैसे दया व वापरा** तत्वावर देखभाल व दुरुस्ती करीता देणेबाबत खाजगी संस्थांकडून अर्ज आलेले आहेत.

नवी मुंबई, ठाणे महानगरपालिकेने सुध्दा त्यांची शौचालये खाजगी संस्थांना पैसे दया व वापरा या तत्वार देखभाल व दुरुस्ती करीता दिलेली असून त्यानुसार त्यांची देखभाल व दुरुस्ती सुरळितपणे चालू आहे. तसेच जुनी शौचालये आवश्यकतेनुसार तोडून त्या जागेवर सुलभ शौचालये आवश्यकतेनुसार तोडून त्या जागवर सुलभ शौचालये बांधण्याची कामे सुध्दा **बांधा व वापरा** तत्वावर देण्यात आलेली आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार व खाजगी संस्थांकडून आलेल्या अर्जानुसार विविध भागात सुलभ शौचालये बांधा व वापरा तत्वावर बांधण्यास तसेच आवश्यकता असल्यास जुनी शौचालये तोडून नविन **बांधा व वापरा** तत्वावर बांधण्यास व महानगरपालिकेची असलेली शौचालये पैसे दया व वापरा तत्वावर खाजगी सस्थांना करारनामा करुन देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

(१) मनपा [illegible] प्रमाणे, व मनपा जागा देईल त्या ठिकाणीच [illegible]

सुचक :- शानु गोहील अनुमोदन :- चिंतामण पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

Shanu Gohil [signature] [signature]

महापौर

# मिरा भाईंदर महानगरपालिका.

## मा. महासभा दि. १९. १०. २००२, ठराव क्र.

प्रकरण क्र. १९ :- महानगरपालिका कार्यालयामध्ये नविन दुरध्वनी व्यवस्था करणेबाबत.
विचार विनिमय करुन निर्णय घेणे....
नविन दुरध्वनी व्यवस्था अंदाजपत्रकीय तरतुद रक्कम रु ५,००,०००/-

ठराव क्र. २४

महानगरपालिका कार्यालयामध्ये असलेली दुरध्वनी यंत्रणा[ईपीअेबीएक्स] ही तात्कालीन नगरपालिका जुने कार्यालयासाठी खरेदी केलेली होती. जुन्या कार्यालया पेक्षा महापालिका नविन कार्यालय मोठे आहे. त्यामुळे सदरची यंत्रणा अपुरी पडत असून अतिभारामुळे सतत बिघडत असते. परीणामी कार्यालयातील दैनंदिन कामकाजामध्ये अडचण निर्माण होत आहे.

त्यामुळे महानगरपालिका कार्यालया करिता नविन दुरध्वनी व्यवस्था करणे आवश्यक आहे. कार्यालयामध्ये खालील दोन प्रकारे दुरध्वनी व्यवस्था करता येईल.

१] नविन [ईपीअेबीएक्स] दुरध्वनी यंत्रणा खरेदी करुन संपूर्ण कार्यालयात नव्याने इंटरकॉम व्यवस्था करणे. [संपूर्ण वायरींग नविन करुन आवश्यकतेनुशार इन्स्टयुमेंट खरेदी करणे.]

२] खाजगी दुरध्वनी केंद्राव्दारे दुरध्वनी व्यवस्था करणे.

* वरील दुरध्वनी व्यवस्थांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे. *

| अ. क्र. | ईपीअेबीएक्स यंत्रणेव्दारे दुरध्वनी व्यवस्था. करणे. | अ. क्र. | खाजगी दुरध्वनी केंद्राव्दारे दुरध्वनी व्यवस्था करणे. |
|---|---|---|---|
| | नविन ईपीअेबीएक्स यंत्रणा खालील सुविधा देणारी खरेदी करणे आवश्यक. आहे. | | खाजगी दुरध्वनी केंद्राव्दारे दुरध्वनी व्यवस्था करणे. |
| अ] | बाहेर केलेल्या कॉलचे नंबर, वेळ, तारीख व संभाषण कालावधी इत्यादी माहिती मिळू शकेल अशी यंत्रणा. | अ] | नविन [ईपीअेबीएक्स] दुरध्वनी यंत्रणा खरेदी करावी लागणार नाही. |
| ब] | एकूण २० ते २५ मुख्यलाईन जोडता येणे शक्य होईल अशी यंत्रणा. | ब] | प्रत्येक मुख्य लाईनसाठी रु ३,०००/- कनेक्शन चार्ज. |
| क] | भविष्यात एकूण ९० ते १०० इंटरकॉम लाईन जोडता येणे शक्य होईल अशी यंत्रणा. | क] | प्रत्येक मुख्यलाईनसाठी रु १७५/- |
| ड] | वरिष्ठ अधिका-यांच्या कक्षामध्ये संपूर्ण यंत्रणेचा आढावा घेतायेईल अशा प्रकारची उपकरणे जोडता येणे शक्य होईल. | ड] | प्रतिकॉल रु १. २०/- चार्ज. |
| इ] | स्वागतपर वाक्य व तदनंतर ऑपरेटरशिवाय थेट इंटरकॉमवर बोलण्याची सुविधा असणारी यंत्रणा. | इ] | इंटरकॉम सुविधा मोफत. |
| | तसेच संपूर्ण कार्यालयात नव्याने इंटरकॉम लाईनसाठी वायरींग करावे. लागणार आहे. व आवश्यकतेनुसार नविन टेलिफोन इस्टयूमेंट खरेदी करावे लागणार आहेत. | फ] | इंटरकॉम लाईन अमर्यादित जोडता येतील. कनेक्शन व इंटरकॉमची संपूर्ण व्यवस्था करणे. खाजगी यंत्रणेची जबाबदारी असेल. |

(३०)

वरील दोन प्रकारच्या दुरध्वनी व्यवस्थेचा विचार केला असता.

१] क्र. १ ची व्यवस्था केल्यास मनपा. विभागीय कार्यालयांना इंटरकॉम सुविधा देता येणार नाही. उलट क्रमांक दोनची व्यवस्था केल्यास मुख्य कार्यालय व सर्व विभागीय कार्यालयामध्ये इंटरकॉम सुविधा देता येईल. त्यासाठी एमटीएनएल. कनेक्शनची आवश्यकता लागणार नाही.

२] खाजगी दुरध्वनी केंद्राच्या सुविधानुसार प्रत्येक मेन कनेक्शन सात क्रमांकाचे नविन नंबर दिले जातील. व इंटरकॉमसाठी तीन प्रकारचे नंबर दिले जातील. ही सुविधा[ईपीअेबी एक्स] यंत्रणेव्दारे करता येणार नाही. [ईपीअेबीएक्स] व्दारे फक्त इंटरकॉमसाठी तीन क्रमांकाचे नंबर देता येतील व ते फक्त मुख्य कार्यालया पुरतेच मर्यादित व मुख्य लाईनसाठी एमटीएनएल च्या कनेक्शनची आवश्यकता लागणार आहे.

३] खाजगी दुरध्वनी केंद्रांच्या सुविधाव्दारे मुख्य कार्यालयातुन मुख्य कार्यालयात व विभागीय कार्यालयामध्ये इंटरकॉमव्दारे मोफत संपर्क साधता येईल. ईपीअेबीएक्स यंत्रणेव्दारे हि सुविधा फक्त मुख्य कार्यालयापुरतीच मर्यादित असुन विभागीय कार्यालयापुरतीच मर्यादित असुन विभागीय कार्यालयासाठी एमटीएनएल. कनेक्शनचा वापर करावा लागणार आहे.

४] खाजगी दुरध्वनी व्यवस्थेसाठी कनेक्शन देणे संपूर्ण वायरिंग करणे [इंटरकॉमसह] याचा खर्च ते स्वत: करणार असुन त्यासाठी महानगरपालिकेस फक्त कनेक्शन चार्ज रु. ३०००/- करावा लागणार आहे. तसेच यंत्रणेच्या दुरुस्तीची जबाबादारीही खाजगी दुरध्वनी केंद्राची असणार आहे. व ईपीअेबीएक्स दुरध्वनी यंत्रणेसाठी संपूर्ण कार्यालयामध्ये नव्याने वायरींग करावे लागणार आहे. व वेळावेळी दुरुस्तीसाठी खर्च करावा लागणार आहे.

५] खाजगी दुरध्वनी सुविधाव्दारे अमर्यादित इंटरकॉम कनेक्शन देता येतील. ईपीअेबीएक्स यंत्रणेव्दारे मर्यादित इंटरकॉम कनेक्शन देता येतील.

६] खाजगी दुरध्वनी सुविधाव्दारे सध्या आवश्यकतेनुसार मुख्य कार्यालयासाठी नविन २५मेन कनेक्शन घेवून संपूर्ण कार्यालयामध्ये इंटरकॉम सुविधा करता येईल. व आवश्यक तेवढेच एमटीएनएल कनेक्शन ठेवून इतर कनेक्शन बंद करता येतील व भविष्यात विभागीय कार्यालयामध्ये कनेक्शन घेवून संपूर्ण महानगरपालिका प्रशासन केंद्रीत संपर्क व्यवस्थेने जोडता येईल.

७] इपीअेबीएक्स दुरध्वनी यंत्रणेव्दारे दुरध्वनी सुविधा करणेस अंदाजित रक्कम रु. ४०००००/- इतका खर्च अपेक्षित असुन खाजगी केंद्राव्दारे दुरध्वनी सुविधा करणेस प्रति कनेक्शन रुपये- ३०००/- व मासिक भाडे रु. १७५/- प्रतिकॉल चार्जेस रु. १. २० खर्च आहे.

वरील बाबींचा विचार केला असता ईपीअेबीएक्स यंत्रणेची सेवा खर्चिक व अनियमित वाटते. कारणे सदरची मशिन १०० यांत्रिक बिघाड होवून बंदपडते. व सेवा खंडीत होवून खर्चही करावा लागतो. कमी खर्चात खाजगी यंत्रणेची सेवा नियमित व व्यवस्थित पुरविण्याची जबाबादारी त्यांची असल्याने ते तात्काळ सुविधा देतील.

सुचक - चंद्रकान्त वैती

अनुमोदक
महेंन्द्र सिंग चौहान

ठराव सर्वानुमते मंजुर

वरील बाबींचा [illegible] [illegible] [illegible] [illegible]
[illegible] आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

चंद्रकांत वैती

महापौर

(39)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १९/१०/२००२.

विषय क्र. २० :- संत गाडगेबाबा अभियान कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे.

ठराव क्र. 24

महाराष्ट्रात संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामस्वच्छता अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. सदर अभियानास ग्रामीण भागातुन मोठा प्रतिसाद मिळाला आहे. या धर्तीवर नागरी स्वच्छता अभियान राबविण्याबाबत मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांनी दि. २९/०९/२००२ रोजी महाराष्ट्रातील नगरपालिका, महानगरपालिका यांची कार्यशाळा घेतली होती. यावेळी नामदार मा. मुख्यमंत्री साहेबांनी १४ नोव्हेंबर पासुन महाराष्ट्रातील सर्व नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान राबविण्या बाबत सुचना दिल्या आहेत त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात १४ नोव्हेंबर २००२ पासून वर्षभर करीता सदरची मोहीम राबविण्यात येणार आहे. सदरची मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यासाठी या मोहिमेचे प्रसिध्दीकरण करणे, मोहिमेबाबत चर्चासत्र आयोजित करणे तसेच या मोहिमेअंतर्गत करावी लागणारी सर्व कामे व या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे. ~~तसेच सदर विषयाची रुपरेषा आखण्यासाठी ही सभा मा० महापौर सो० ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यास ही सभा मंजुरी देत आहे.~~

सुचक : हंसकुमार पांडे
HKumar [signature]

अनुमोदन : ज्योत्सना हसनाळे [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature] महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

(32)

मिरा भाईंदर महानगरपालिका.

मा. महासभा दि. १९. १०. २००२ ठराव क्र. ची नक्कल प्रत.

विषय क्र. २१. :- महानगरपालिका कर्मचा-यांना अनुदान देणे बाबत....

ठराव क्र. :- २६

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचा-यांना बोनस व सानुग्रह अनुदान देणे संदर्भात म्युनिसपल लेबर युनियन यांचे पत्र दि. २४. ९. २००२ व मिरा भाईंदर कामगार सेना यांचे पत्र दि. ३. १०. २००२ नुसार महानगरपालिका आस्थापने वरील कर्मचा-यांना बोनस व सानुग्रह अनुदान मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

मागील दोन वर्षापासून शासनाने बोनस देण्यांचे बंद केल्यामुळे तत्कालीन नगरपरिषदेने शासनाचे धोरणानुसार कर्मचा-यांना बोनस दिलेला नाही. या वर्षीसुध्दा अद्यापपर्यंत शासनाचे याबाबतचे धोरण जाहिर झालेले नाही. त्यामुळे शासनाचे बोनस बाबत धोरण जाहिर होण्यांस विलंब होण्याची शक्यता आहे.

तत्कालीन मिरा भाईंदर नगरपालिका व सध्या अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या कर्मचारी वृंदाची पहाणी करता, एकूण उत्पन्नाच्या १८ % खर्च वेतनभत्त्यावर होत आहे. कर्मचारी यांची पदे मंजूर असून सुध्दा वेळीच नियुक्त्या न केल्याने अस्तित्वात असलेल्या कर्मचा-यांना जादा वेळ थांबून कामे करावी लागत आहेत. सुट्टीचे दिवशी येवून कामे करावी लागतात ही वस्तूस्थिती महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटनेने पदाधिकारी व आयुक्त यांचे नजरेस आणून दिलेली आहे. अश्या परिस्थितीत कर्मचा-याचे अतिरिक्त कामाचे मोल म्हणून त्यांना काही जादा मेहनताना देण्यांचा विचार आहे. परंतू कायदयाचे चौकटीत राहून त्याना जादा वेतन देता येत नाही. सबब महानगरपालिकेच्या सर्व कर्मचा-यांना दिवाळी सणा साठी " सानुग्रह अनुदान " म्हणून प्रत्येकी रक्कम रु. ~~३०००/-~~ (*) मंजूर करण्यांत येत आहेत. हा खर्च महानगरपालिकेच्या स्वत:चे निधीतून करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे. परंतू भविष्यात या प्रकरणी शासनाने काही आक्षेप घेतल्यास अनुदानाची रक्कम परत करण्यांत येईल असे " लेखी हमीपत्र," संबंधिताकडून घेण्यांत यावे.

(०)-वर्ग - ४ करीता. ~~२५००~~/- ३०००/-
(*) वर्ग ३ करीता ३०००/- (त्रीनी)

सुचक :- मॉरस रॉड्रिक्स [signature]

अनुमोदन :- हरेश गावंड [signature]

ठराव सर्वानुमते मंजूर.

[signature]
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१९/१०/२००२

विषय क्र.२२ :- रस्ता रुंदीकरणात येणारे स्ट्रीट लाईट पोल/पिलर शिफ्टींग करणेकामी बी.एस.ई.एस. व एम.टो.एन.एल चे येणारे देयक अदा करणे बाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. :- २८

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध भागात रस्ता रुंदीकरणाची कामे प्रगती पथावर असून सदर रस्ते रुंदीकरण झाल्यावर रस्त्यात येणारे स्ट्रीट लाईट पोल, मिनिपिलर्स जक्शंन बॉक्स हटविणेबाबत महानगरपालिकेमार्फत पत्र व्यवहार करण्यात येतो. तसेच मा.नगरसेवक व पदाधिका-यामार्फत सुध्दा विविध स्ट्रीट लाईट पोल शिफ्टींग बाबत पत्रव्यवहार करण्यात येत आहे. त्यानुसार बी.एस.ई.एस, एम.टो.एन.एल. कडे कळविल्यानंतर त्यांच्याकडून सदर शिफ्टींग कामाची अंदाजपत्रके करुन महानगरपालिकेकडे सदर रक्कम जमा करणे बाबत मागणी करण्यात येते.

भाईंदर (प) स्टेशन रोड, नवघर रोड, बी.पी.रोड. गोडदेव फाटक रोड वरील स्ट्रीट लाईट पोल व जंक्शन बॉक्स त्वरित हटविणे गरजेचे आहे.

वरील प्रमाणे बी.एस.ई.एस.कं व एम.टो.एन.एल.कं.ने स्वतः खर्चाने रुंदीकरणातील स्ट्रीट लाईट पोल, जंक्शन बॉक्स व मिनिपिलर्स हटवावेत. सदर ठरावास मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- उमा सपार      अनुमोदन :- आत्माराम गावंड

सौ. उमा विश्वनाथ सपार

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

(38)

मा. महासभा दि. १९/१०/२००२, ठराव क्र. २८ ची प्रत.

विषय क्र. २३ :- मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत मागविलेली निविदा रद्द करून नविन मागविण्या बाबत निर्णय घेणे.

ठराव :- २८

मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरातमुख्य रस्त्यावर झाडे लावण्या बाबत प्रस्ताव तत्कालीन नगरपालिका मा. स्थायी समिती दि. १६. १०. २००१ चे सभेत मंजूर करण्यात येवून दै. सकाळ मध्ये ठेका पध्दतीने झाडे लावण्याबाबत जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यांत आली होती. जाहीर नोटीशीद्वारे प्राप्त निविदा मा. स्थायी समिती सभा दि. २१. ११. २००१, ठराव क्र. २७९ अन्वये सर्वांत कमी दराची निविदा मंजूर करण्यांत येवून ठेका पध्दतीने वृक्षारोपण करण्याबाबत ठेका मे. ग्रिन होरीजन या कंपनीस देण्यांत आला. त्यानुसार दि. ४. ५. २००२ रोजी कार्यादेश देण्यात आले व दि. २४. ६. २००२ रोजी मुख्य रस्त्याची नावे व रस्त्यावर लावण्याच्या झाडांचे प्रकारासह यादी देण्यांत आली. परंतू त्यांनी झाडे लावण्या विलंब केल्याने लोकप्रतिनिधी, नागरीक व वृक्षप्रेमी संस्था यांचे तक्रारीचे प्रमाण वाढल्याने त्यांना दि. १५. ७. २००२ व दि. २०. ८. २००२ रोजी नोटीस बजावण्यांत येवून खुलासा मागविण्यात आला होता. परंतु त्यांनी खुलासा केलेला नाही. त्यामुळे त्यांना दि. ५. १०. २००२ रोजी अंतिम नोटीस बजावण्यांत आली. त्याचाही खुलासा त्यांना केलेला नाही. त्यामुळे मे. ग्रिन होरीजन यांनी महानगरपालिकेशी केलेल्या करारपत्रातील अटीशर्तींचा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांनी भरलेली सुरक्षा अनामत रु. २. ५० लाख जप्त करुन लावलेल्या झाडांचे पैसे त्यांना देवू नये व नविन झाडे लावण्याचे टेंडर मागविल्यामुळे होणारे नुकसान संबधीतांकडून वसुल करण्यांत यावे व त्याचा झाडे लावण्याचा ठेका रद्द करण्यात यावा. असे सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

तसेच नविन झाडे लावण्याबाबत फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. या महाराष्ट्र शासनाच्या ठाणे वन प्रकल्प विभाग, ठाणे यांचेकडे झाडे लावून जगवून देण्याबाबत प्रस्ताव पाठवून त्याचे कडील दरपत्रक बअटीशर्ती मागवून जर त्याचे दर वाजवी असतील, तर त्यांना झाडे लावणेस देण्यांत यावीत. अन्यथा नविन झाडे लावण्याबाबत निविदा मागविणेस येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

सुचक :- गीता जैन

अनुमोदन :- रोहिदास पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर.

(sd/-)
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२००२

**दु:खवटा ठराव क्र. २८ अ :-**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख यांचे पिताश्री दगडुजी देशमुख यांचे दि. ११/१०/२००२ रोजी निधन झाले. तसेच अभिनेत्री प्रिया तेंडुलकर, जेष्ठ साहित्यीक वसंत सबनीस, ना. स. इनामदार व नवघर रोड येथील शिवमंदिराचे ट्रस्टी एस. व्ही. सुरप्पा यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या निधानामुळे त्यांच्या कुटूबियांवर ओढवलेल्या दु:खात ही महासभा सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो अशी प्रार्थना करु या व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहू.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००२

**अभिनंदन ठराव क्र. २९ :-**

नवि मुंबई महानगरपालिकेवर तिसऱ्यांना महापौर म्हणून संजीव नाईक यांची निवड झालेली आहे. तसेच उपमहापौर म्हणून श्री. रमकांत म्हात्रे यांची निवड झालेली आहे. याबद्दल मी अभिनंदनाचा ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००२

**प्रकरण क्र. २४ :-** **दि. १९/१०/२००२ रोजी झालेल्या महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ३० :-**

दि. १९/१०/२००२ रोजी झालेल्या महासभेचे इतिवृत्तांत वरीलप्रमाणे दुरुस्ती करुन सदरचे इतिवृत्तांताला मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

(३८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.२०/११/२००२

प्रकरण क्र.२५ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध आरक्षण जागेवर निर्देशक फलक तयार करुन फिटींग करणेस व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे.

ठराव क्र. :- ३९

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर विकास योजनेनुसार विविध आरक्षणाने बाधीत जागेवर फलक लावणेबाबतचा प्रस्ताव सहा.नगररचनाकार यांनी सादर केला आहे. त्या अनुषंगाने याबाबतची तांत्रिक मंजूरी बांधकाम विभागाने दिलेले आहे. बांधकाम विभागाने दिलेल्या निर्देशानुसार खालील प्रमाणे फलक तयार करुन फिटोंग करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १) | १ १/२ X १ १/२ X ४ एमएम लोखंडी अँगल १२.७० मी. लांब त्यावर १ १/२ X १ १/२ चा अँगल लावून जी.आय. सीट लावणे व रंग काम करुन दिलेला मजकूर पेंटोंग करणे. | ३७६ नग |

वरील प्रमाणे फलक तयार करुन फिटोंग करणेस अंदाजे रक्कम रु.५,९५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. याकामी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात रक्कम रु.१०,००,०००/- इतकी तरतूद केली आहे. याबाबत विकास आराखडयातील आरक्षीत जमिनीची खरेदी, विक्री करणे संबंधात लोकांची फसवणूक होऊ नये अनधिकृत बांधकाम होऊ नये. सदनिका खरेदी करतांना लोकांनी व्यवहार करु नये यासाठी सदरचे फलक लावणे आवश्यक आहे.

तरी महानगरपालिका क्षेत्रांत आरक्षीत जागेवर निर्देशक फलक तयार करुन फिटोंग करणेस व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सूचक हिरा गायकवाड (सही) अनुमोदन नरेंद्र मेहता (सही)

ठराव सर्वानुमते मंजूर.

(सही)
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

(८०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.महासभा दि.२०/११/२००२**

प्रकरण क्र.२६ :- नगरभवन मंगलकार्यालयासाठी नविन प्लास्टोक खुर्च्या खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे.

ठराव क्र. 32

महानगरपालिका नगरभवन येथील मंगलकार्यालय हॉल लग्नकार्य, धार्मिक कार्य तसेच इतर सांस्कृतिक, सार्वजनिक कार्यक्रमासाठी वापरला जातो. सदर हॉलमध्ये असलेल्या खुर्च्या कमी पडत असल्याने नविन प्लास्टोक खुर्च्या खरेदी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १ ) | प्लास्टोक खुर्च्या २३" | ३०० नग |

वरील प्रमाणे खुर्च्या खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु.१,०५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच सदरकामी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात नगरभ्वन व सभागृह फर्निचर उपकरण कुलर व इतर वीज उपकरण या शिर्षकाखाली रक्कम रु.२०००००/- इतकी तरतूद केलेली आहे.

तरी नगरभवन मंगलकार्यालयासाठी नविन प्लास्टोक खुर्च्या खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- गिला जैन    अनुमोदन :- परशुराम म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

( निविदा ३७४ )

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००२

**प्रकरण क्र.२७ :- महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांकरिता गणवेश खरेदी करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे.**

**ठराव क्र. ३३ :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांकरिता दोन वर्षातून एकदा प्रत्येकी दोन गणवेश (शिवणावळीसह) देणेबाबत. तत्कालिन नगरपालिकेने उपविधीत तरतूद केलेली आहे. तसेच महानगरपालिकेचे उपविधी मंजूर होण्यास बराच विलंब लागणार असल्याने नगरपालिका उपविधीनुसार महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांना गणवेश देण्याबाबत आस्थापना विभागाने अहवाल सादर केलेला आहे.

यापूर्वी कर्मचाऱ्यांना सन १९९९-२००० मध्ये गणवेश दिलेले आहेत. त्यामुळे यावर्षी कर्मचाऱ्यांना गणवेश देणे जरूरीचे आहे. आस्थापना विभागाचे अहवालानुसार खालीलप्रमाणे स्थायी कर्मचाऱ्यांना गणवेश देणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदनाम | एकूण कर्मचारी संख्या | पुरूष कर्मचारी | स्त्री कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| १) | वाहन चालक | २३ | २३ | -- |
| २) | शिपाई | १०१ | ९६ | ५ |
| ३) | मुकादम | १० | १० | -- |
| ४) | स.का. | ८१२ | ७७२ | ४० |
| ५) | मेस्त्री | २ | २ | - |
| ६) | दवंडी बोअरवेल | १ | १ | -- |
| ७) | प्लंबर | २ | २ | -- |
| ८) | पंपचालक | १ | १ | -- |
| ९) | वॉलमन | १ | १ | -- |
| | **एकूण कर्मचारी** | **९५३** | **९०८** | **४५** |

वरील कर्मचाऱ्यांपैकी १ वाहन चालक व १८ कामगार (पूरूष) यांना अग्निशमन विभागामध्ये काम करत असल्याने अग्निशमन कर्मचाऱ्यांसोबत गणवेश दिलेले आहेत. त्यामुळे एकूण १९ (पूरूष) कर्मचारी वगळता एकूण ८८९ (पुरूष) कर्मचाऱ्यांना प्रत्येकी दोन प्रमाणे एकूण १७७८ गणवेश देणेस (कापड खरेदी करून शिलाई करणेस) व एकूण ४५ (महिला) कर्मचाऱ्यांकरिता प्रत्येकी दोन साड्या व दोन ब्लाऊज प्रमाणे एकूण ९० साड्या व ब्लाऊज देणेंस अंदाजित रक्कम रू. १०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरकामी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सामान्य प्रशासन - कर्मचारी गणवेश साफ सफाई व सोयी साफसफाई कर्मचारी गणवेश व संकीर्ण सर्व विभागीय कर्मचारी गणवेश या शिर्षकाखाली अनुक्रमे रक्कम रू. ५,००,०००/- रू ५,००,०००/- व रू. ४,००,०००/- अशी एकूण रू. १४,००,०००/- तरतूद केलेली आहे. तरी महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांकरिता गणवेश खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार मंजुरी देत आहे.

सूचक रविंद्र माळी

अनुमोदन रिटा शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००२

(82)

**प्रकरण क्र. २८ : महानगरपालिका कार्यालयासाठी लागणारे फर्निचर खरेदी करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे.**

**ठराव क्र. ३४ :**

महानगरपालिका कार्यालयासाठी लागणारे फर्निचर मिळणेबाबत विविध खात्यांकडुन मागणी केलेली आहे. सदरकामी सन २००२-०३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात रक्कम रू. ३,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे व महानगरपालिका सभागृह खुर्च्या दुरूस्ती व नविन १० खुर्च्या खरेदी करणे. तसेच महानगरपालिका सभागृह - वार्ताहर कक्षासाठी प्लास्टीक खुर्च्या ३० नग खरेदी करणे कामी दरपत्रके मागविण्यात आलेली असून सदरकामी रक्कम रू. ६१,०००/- खर्च होणार आहे. त्यामुळे कार्यालयासाठी फर्निचर खरेदीसाठी रक्कम रू. २,३९,०००/- एवढीच तरतूद शिल्लक आहे. विविध खात्यांनी फर्निचरची केलेली मागणी व उपलब्ध तरतूद पहाता तरतूद रक्कम अपूरी पडणार आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आवश्यक तेवढीच खरेदी करणे योग्य होईल.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १. | कपाटे मोठी साईज ७८''x३६''x१९'' (स्टील) २०-२२ गेज, पाच खण (स्टील) | १२ नग |
| २. | टेबल लहान साईज ४८''x२४''x३०'' (स्टील) एक बाजु ३ ड्रॉव्हर, २२ गेज सनमायका टॉप | २० नग |
| ३. | केन खुर्च्या - एस टाईप फुल आणि ट्युबलर (स्टील) खुर्च्या, १६ गेज पाईप | ६० नग — 20 |
| ४. | प्लास्टीक खुर्च्या - २३'' — | १२५ नग — +20 |

वरीलप्रमाणे फर्निचर खरेदी करणे कामी अंदाजे रक्कम रू. २,३८,७५०/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी कार्यालयासाठी वरीलप्रमाणे फर्निचर खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ प्रकरण ५ नुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सूचक — दिनेश नलावडे (signature)

अनुमोदन — सुर्यकांत मोरे (signature)

**ठराव सर्वानुमते मंजुर**

(signature) महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

"गोदरेज कंपनी" मान्यताप्राप्त कंपनीकडुन खरेदी करावे

(४३)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.२०/११/२००२ ठराव क्र.    ची नक्कल प्रत

प्रकरण क्र.२९:- मा.संचालक,नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील दि.९/४/२००१ चे शुध्दीपत्रकातील अट शिथील करणे बाबत. मा.स्थायी समिती सभा दि.३१/१०/२००२ ठराव क्र.२५ वरती विचार विनिमय करणे.

ठराव क्र. ३५

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या ५३८ कर्मचा-यांना मा.संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीके/१०९७/प्र.क्र.५८३/९७/४, दि.१.६.२००० नुसार तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेने कार्यरत रोजंदारी कर्मचारी यांना दि.१.६.२००० पासून त्या आदेशातील अटीशर्तीनुसार नियमित सेवेत सामावून घेतले असून कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त अथवा अन्य कारणान्वये त्यांची पदे रिक्त झाल्यास सदरची पदे शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीने भरण्यांत यावी असे निर्देशित केलेले आहे. परंतु दरम्यानचे कालावधीत मा.संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील शुध्दीपत्रक क्र.नप्रसई/१०२०/प्र.क्र.१०२/२००१/७, दि.९.४.२००१ नुसार रोजंदारी कर्मचारी यांना विशेष बाब म्हणून सामावून घेण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे त्या पदावरील कर्मचा-यांची सेवानिवृत्तीमुळे अथवा कोणत्याही कारणास्तव ही पदे रिक्त झाल्यास पदे आपोआप व्यपगत होतील व भविष्यात ही पदे नगरपरिषदेत भरता येणार नाहीत असे निर्देशित केलेले आहे.

त्यानुसार तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेने मा.संचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील दि.१.६.२००० चे आदेशान्वये ५३८ सफाई कामगारांना नियमित सामावून घेतले आहे. परंतु सफाई कामगारांना साफसफाईची व तत्सम कामे करावी लागत असल्याने अशी कामे करणा-या कर्मचा-यांचे प्रकृती स्वास्थ बिघडण्याचे प्रमाण फार मोठया प्रमाणावर दिसून येते. तसेच अशा कामगारांची आर्थिकस्थिती सुध्दा सबळ नसते. त्यामुळे हे कामगार सेवानिवृत्त अथवा मयत झाल्यास कर्मचा-यांच्या कुटुंबियांस शासनाचे या आदेशानुसार नोकरीची शाश्वती नसल्याने कुटुंबाची फार बिकट परिस्थिती निर्माण होते. करिता ५३८ सफाई कामगार यांच्या बाबत सहानुभूती व मानवतावादी दृष्टिकोन ठेवून मा.संचालक, नगरपालिका प्रशासन, संचालनालय, मुंबई यांचे दि.९.४.२००१ चे शुध्दीपत्रकातील अट शिथील करणे धोरणात्मक बाब असल्याने मा.स्थायी समिती सभा दि.३१/१०/२००२ ठराव क्र.२५ अन्वये शिफारस केल्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.सचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांचेजवळ पाठविणेस मंजूरी देत आहे.

सुचक :- मेहंद्रसिंह चौहान    अनुमोदन :- हंसु पांडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. २०/११/२००२

प्रकरण क्र.३० :- मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळा आंतरशालेय क्रिडा स्पर्धा घेणे बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र. :- ३९

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या एकूण २९ प्राथमिक शाळा असून सर्व शाळा मध्ये एकूण ९४८३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणा बरोबर विद्यार्थ्याचा शैक्षण्कि विकासाप्रमाणे शारीरीक विकास होणे आवश्यक आहे. यासाठी मिरा भाईदर नगर परिषद दरवर्षी न.पा.प्राथमिक शाळांच्या शालेय क्रिडा स्पर्धा आयोजित करीत असते. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टिने शिक्षणा बरोबरच वैयक्तीक तसेच सांधिक क्रिडा स्पर्धा घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे क्रिडा स्पर्धा घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे क्रीडा स्पर्धा डिसेंबर अखेरीस किंवा जानेवारीच्या पहिल्या आठवडयामध्ये भरविण्यात येतात.

यापूर्वी सदर स्पर्धा नगरपरिषद प्राथमिक शाळा तसेच क्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळामधील विद्यार्थ्यांच्या भरविण्यात आलेल्या होत्या. तसेच सदर स्पर्धामध्ये कला व क्रिडा या दोन्ही प्रकारच्या स्पर्धांचा सामावेश करण्यात आला होता. खाजगी प्राथमिक शाळा तसेच नगरपालिका प्राथमिक शाळा यांचे कला व क्रिडा स्पर्धा भरवितांना नियोजन करणे अत्यंत कठीण गेले होते. पुर्वानुभव लक्षात घेता यावर्षी सदर स्पर्धा फक्त महानगरपालिकेच्या २९ प्राथमिक शाळा आंतरशालेय स्पर्धा घेऊन सदर स्पर्धामध्ये फक्त क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे असे प्रस्तावित आहे. महानगरपालिका प्राथमिक शाळा स्तरावर स्पर्धा आयोजित केल्यास अंदाजे १५०० विद्यार्थी सहभाग घेतील अशी अपेक्षा आहे.

फक्त महानगरपालिका प्राथमिक २९ शाळा आंतरशालेय क्रिडा स्पर्धा भरविण्यास अंदाजे खर्च खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

| | तपशिल | | अंदाजे रुपये |
|---|---|---|---|
| १) | क्रिडा मंडप, स्टेज व बसभाडे | टेंडर मागवून | १,२५,०००/- |
| २) | चहापाणी नाष्टा | -- -- | ७५,०००/- |
| ३) | स्पर्धकास ट्रॉफी | -- -- | ६०,०००/- |
| ४) | फोटोग्राफी, व्हीडिओ शुटींग | -- -- | १०,०००/- |
| ५) | प्रशस्तीपत्रक निमंत्रण पत्रिका व बॅनर. | -- -- | १५,०००/- |
| ६) | हारगुच्छ फुले व इतर | -- -- | ३,०००/- |
| ७) | इतर आवश्यक साहित्य खर्च | -- -- | १२,०००/- |
| | | | ३,००,०००/- |

महानगरपालिकेने फक्त महानगरपालिका २९ प्राथमिक शाळांचे क्रिडा स्पर्धा भरविण्यास अंदाजे वरीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे. सन २००२-२००३ मधील अंदाजपत्रकामध्ये स्पर्धासाठी रु.९ लाख तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी क्रिडास्पर्धेचे आयोजनास येणा-या खर्चास ही सभा आर्थिक प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक चिंतामण पाटील    अनुमोदन :- शानू गोहील

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दिनांक २०.११.२००२ (४५)

प्रकरण क्र. :- ३१ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध भागात स्ट्रीट लाईट बसविणे, पोल शिफ्ट करणे, डबल ब्रॅकेट बसविणे कामी मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्रमांक ३८

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत स्ट्रीट लाईट बसविणे, पोल शिफ्ट करणे, डबल ब्रॅकेट बसविणे कामाची खालीलप्रमाणे प्रस्ताव करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १] | उत्तन धावगी रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे. |
| २] | घोडबंदर येथे भालचंद्र रावजी नाना शंकर शेठ रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे. |
| ३] | घोडबंदर गांईन झोपडपट्टी अंतर्गत रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे. |
| ४] | भाईंदर [प] मांडवी स्ट्रीट येथे स्ट्रीट लाईट बसविणे. |
| ५] | भाईंदर [प] जनता नगर रोडवर स्ट्रीट लाईट बसविणे. |
| ६] | भाईंदर [प] गणेश देवल नगर येथे स्ट्रीट लाईट बसविणे. |
| ७] | भाईंदर [प] डॉ. हेगडेवार मार्ग पासून अस्मिता बिल्डींग कडे जाणा-या रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे. |
| ८] | भाईंदर [प] पोलिस स्टेशन समोरील केसरी गल्लीतील श्रीराम शाळा ते सुबोध विद्यालयापर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे. |
| ९] | मिरा रोड एस.टी.स्टॅन्ड. ते शांती रोड सिल्व्हर प्लाझा समोर स्ट्रीट लाईट बसविणे. |
| १०] | नवघर रोड वैदेन पार्क रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे. |
| ११] | भाईंदर [पूर्व] डॉ. हेडगेवार मार्ग नवघर रेल्वे फाटक ते गोल्डन नेस्ट गेट पर्यंत व रस्ता रुंदीकरण झाल्यावर राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पर्यंत मध्यभागी स्ट्रीट लाईट बसविणे. |
| १२] | नवघर रोड सुजाता शॉपिंग सेंटर वाढीव पोल बसविणे. |
| १३] | नवघर नाका वाढीव पोल बसविणे. |
| १४] | मोर्वा गाव कडे जाणा-या रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे. |
| १५] | भाईंदर [प] नारायण नगर कॉर्नर, शिवसेना कार्यालयासमोर स्ट्रीट लाईट बसविणे. |
| १६] | मिरारोड कनकिया नगर [डंपिंग कडे] जाणा-या रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे. |

१७] डॉ. हेगडेवार मार्ग उड्डाणपूल समांतर रस्ता गीता नगर फेज - ७ कडे जाणा-या रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे.

१८] डॉ. हेगडेवार मार्ग सेनासिल्व्हर प्लाझा रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे.

१९] डोंगरी आनंद नगर रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे.

२०] भाईंदर [प] नेहरू,नगर भागात वाढीव स्ट्रीट लाईट पोल बसविणे डबल ब्रॅकेट पोल बसविणे, सेक्रेड री स्कूल, गोम्स स्ट्रीट , गीता कुंज, परेरा हाऊस, चंदुलाल वाडी येथे पोल डबल ब्रॅकेट करणे.

२१] भाईंदर [प] स्मशानावर स्ट्रीट लाईट बसविणे.

२२] नाझरेथ शाळा, अण्णा नगर, मेरी व्हीला येथे पोल डबल ब्रॅकेट करणे.

२३] डॉ. हेगडेवार मार्ग सोनकी हॉटेल ते लोढा पार्क रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे.

२४] भाईंदर [प] आंबेडकर नगर रोड ते इंदिरा कॉम्पेक्स रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे.

२५] भाईंदर [पूर्व] कांती पॅराडाईज ते हि मालय दर्शन पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे.

२६] मिरा-[illegible] श्याम कॉम्प्लेक्स, विजय पार्क भागात स्ट्रीट लाईट बसविणे.

२७] मुर्धा वाडी सद्गुरु मंदीर रोडवर स्ट्रीट लाईट बसविणे.

२८] मुर्धा गांव साईबाबा नगर येथे स्ट्रीट लाई ट बसविणे.

२९] लोढा पार्क मिरा इन्क्लेव्ह रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे.

३०] भाईंदर [प.] सिध्दी विनायक मार्ग [बेकरी गल्ली] चिंतामन अपार्टमेंट पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे.

३१] भाईंदर [प.] आंबेडकर रोड, बालाजी नगर क्रॉस रोड वरिल स्ट्रीटलाईट पोल डबल अप करणे.

३२] भाईंदर [पश्] राममंदीर रोड जंक्शन वरील पोल डबल ब्रॅकेट करणे.

३३] नवघर रोड साई किरण कॉम्प्लेक्स पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे.

३४] भाईंदर पूर्व क्रॉस गोडावून रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणे.

३५] भाईंदर पूर्व नर्मदा नगर स्ट्रीट लाईट पोल शिफ्टींग करणे.

३६] भाईंदर [ प. ] नाझरेथ आगर झोपडपट्टी स्ट्रीट लाईट पोल शिफ्ट करणे.

३७] भाईंदर [प.] मोती नगर भागतील स्ट्रीट लाईट पोल शिफ्ट करणे.

३८] मिरा रोड स्टेशन हेल्थ सेंटर ते शांतीनगर स्ट्रीट लाईट पोल शिफ्ट करणे.

३९] अमर पॅलेस हॉटेल ते हनुमान मंदीरा, मिरा गाव स्ट्रीट लाईट पोल शिफ्ट करणे.

४०] गोडदेव नाका अयोध्या निवास स्ट्रीट लाईट पोल शिफ्ट करणे.

४१] काशिमाव राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ स्वनिल बिल्डींग पर्यंत स्ट्रीट लाईट पोल शिफ्टींग करणे.

४२] उत्तन देवतलाव स्ट्रीट लाईट पोल शिफ्टींग करणे.

४३] पेणकर पाडा सागर हॉटेल ते हनुमान मंदिर पर्यंतचे स्ट्रीट लाईट पोल, पिलर्स शिफ्टींग करणे.

४४] पेणकर पाडा खोडीयार नगर, महावीर नगर, शिव सृष्टी नगर, गावात स्ट्रीट लाईट पोल बसविणे.

४५] मिरा रोड स्मशानभुमी कडे जाणारा रेल्वे समातर रस्त्यावरील स्ट्रीट लाईट पोल बसविणे.

४६] मिरा रोड शांतीनगर रोड, नविन स्मशान रोड स्ट्रीट लाईट पोल बसविणे.

४७] भाईंदर [प.] लेपोर स्ट्रीट पोल शिफ्टींग करणे.

४८] भाईंदर [प.] स्टेशन रोड, भाईंदर पूर्व नवघर रोड, बी.पी. रोड गोडदेव फाटक रोड, डॉ. हेडगेवार मार्ग रूंदीकरणातील मिनी पिलर्स जंक्शन बॉक्स, स्ट्रीट लाई ट पोल शिफ्ट करणे.

वरील सर्व कामे बी.एस.ई.एस. मार्फत पार पाडण्यात येतात तरी प्रस्तावांना मंजूरी देण्यात येत आहे.

यापुढे स्ट्रीट लाईट विषयक प्रस्तावांना मा. स्थायी समितीची मंजूरी देण्यात यावी.

सौ. उमा वि. सपार सुचक :- उमा सपार

अनुमोदक :- किशोर ठाकुर

ठराव सर्वानुमते मंजूर [signature]

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

:-: मिरा भाईंदर महानगरपालिका :-:

मा. महासभा, दि :- २०/११/२००२.

**प्रकरण क्र. ३२ :- मिरा भाईंदर नगरपालिका जुने कार्यालय इमारत भाडयाने देणे व भाडेकरुंकरीता बांधलेल्या इमारतीमधील गाळे वाटपाबाबत निर्णय घेणे.**

ठराव क्र. ३८

" अ "

**मिरा भाईंदर नगरपरिषद जुनी कार्यालय इमारत विक्रीकर विभागात भाडयाने देण्याबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिकेची जुनी कार्यालय इमारत विक्रीकर - विभागाने भाडयाने देणेबाबत दि. १९. ०१. २००१ च्या पत्रान्वये मागणी केलेली होती. त्या अनुषंगाने सदरचा विषय तत्कालिन नगरपरिषद सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीकरीता ठेवण्यात आला होता. तथापी सर्वसाधारण सभा दि. ७. ३. २००१, ठराव क्रं. ३३९ अन्वये त्यांचा प्रस्ताव नामंजूर करण्यांत आला होता. त्यानंतर विक्रीकर विभागाने दि. १६. ३. २००२ च्या पत्रान्वये पुनश्च: सदरची जागा भाडेपट्टीनी देणेस विनंती केलेली आहे. सदयस्थितीत महानगरपालिकेचे सर्व विभागाचे कामकाज नविन इमारतीत सुरु आहे. व महानगरपालिकेची इमारत व नगरपरिषदेची जुनी इमारत यामध्ये फारसे अंतर नसल्याने ही इमारत वापरविना आहे. सबब ही इमारत विक्रीकर विभागास दिल्यास महानगरपालिकेच्या नियमा उत्पन्नात भर पडणार आहे. सदर इमारतीचे क्षेत्रफळ ७५००. ०० चौ. फुट असुन ५६००. ०० चौ. फुट चटईक्षेत्र आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार भाडे निश्चिती करीता महानगरपालिकेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार हे नोंदणीकृत व्हॅल्यूअर असल्यामुळे त्यांच्याकडून या इमारतीचे भाडे निश्चित करुन घेण्यात आले आहे. त्यांच्या अहवालानुसार भाडयाचा दर रु. १४/- प्रति चौ. फुट [चटईक्षेत्र] एवढा आहे. जुनी इमारत तळ दोन मजल्याची असुन ही पुर्ण इमारत विक्रीकर विभागास आवश्यक आहे. पुर्ण इमारत भाडयाने दिल्यास महानगरपालिकेस प्रतिमाह रु. ७८,४००/- एवढे भाडे मिळू शकेल.

महापालिके तर्फे अनेक पदे मंजूर होणार असून कर्मचारी वर्ग वाढणार ~~[illegible]~~ आहे तसेच सदर इमारतीत पालिकेतर्फे अनेक उपक्रम राबविण्याचे असल्याने त्यामुळे सदर कार्यालय भाड्याने देऊ नये.

" ब "

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर जुने नगरपरिषद कार्यालय इमारतीसमोर दुकान केंद्राचे बांधकाम पुर्ण करण्यांत आलेले आहे. सन-२०००-०१ मध्ये जुन्या नगरपरिषदेच्या समोर रस्ता रुंदीकरणाचे काम करणेकरीता या रस्त्यावरील तात्पुरत्या स्वरुपाचे टप-या, हातगाडी इत्यादी हटविण्याची मोहिम हाती घेण्यांत आली अहोती. त्यावेळी जुन्या नगरपरिषद इमारतीसमोर असलेल्या भाडेकरु व टपरीधारकांस टपरी तोडण्यापुर्वी त्यांनी जागा देणेबाबत पर्यायी व्यवस्था करण्यात येईल. असे पत्र दि. १५.५.२००० अन्वये एकुण १४ टपरीधारकांना देण्यांत आले होते. सदनंतर नगरपरिषदेने ह्या जागेतील टपरीधारकांस व भाडेकरुला दुकान केंद्रे बांधुन गाळे देणेचे ठरविण्यांत आले. इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर नगरपरिषदेने भाडे निश्चितीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर केला होता. तथापि सदरच्या प्रस्तावास मंजूरी प्राप्त झालेली नाही. तदनंतर मिरा भाईंदर नगरपालिकेचे दि. २८.०२.२००२पासुन महानगरपालिकेत रुपांतर झालेले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महानगरपालिकेच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टी निश्चित करण्यासाठी महापालिकेच्या मंजूरीची आवश्यकता आहे.

नगरपरिषदेने गाळ्याचे बांधकाम पुर्ण केल्यानंतर काही टपरीधारकांनी गाळ्याचा ताबा घेतला आहे. तथापि त्यासंबधी आवश्यक असलेला करारनामा महापालिकेशी अद्यापपर्यंत झालेला नाही. श्री. निलेश अनंत मोहिले व श्री. रमेश जोशी ह्यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्रं. २७४५/२००२ अन्वये याचिका दाखल करुन त्यांना गाळा मिळण्याची विनंती याचिकेदारे केली होती. त्या अनुषंगाने मा. उच्चन्यायालयाने दि. १८.९.२००२ रोजी निकाल देवुन याचिका निकाली काढलेली आहे. सदर निकालाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने सदर गाळ्याचे भाडे निश्चिती करणे तसेच गाळेवाटप करण्यासाठी पात्रता व धोरण ठरविणे यासाठी दि. १८.९.२००२ पासुन चार महिने म्हणजेच दि. १७.१.२००३ पर्यंत कालमर्यादा देण्यांत आली आहे. सदर दुकानकेंद्राचे बांधकामाचा

व जागेची किंमत विचारात घेऊन महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार हे नोंदणीकृत व्हॅल्युअर असल्यामुळे भाड्याची किंमत त्यांच्या कडून निश्चित करून घेण्यांत आलेली असुन सदर गाळ्याचे भाडे रू. २१/- प्रति चौ.फुट [चटईक्षेत्र] या प्रमाणे येत आहे. सदर गाळे भाडेपट्टीवर प्रथम तीस वर्षासाठी देण्याचे असल्याने अनामत रक्कम म्हणुन रु. १,५०,०००/- [प्रत्येक गाळा] घेणे संयुक्तीक होईल. तथापि सदर भाडेपट्टी व अनामत रक्कम निश्चित केल्यानंतर जुन्या कार्यालयासमोर रस्ता रूंदीकरण करणेपुर्वी असलेल्या टपरीधारकांस गाळा देण्याबाबत खालील प्रमाणे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

१] भाडेकरू/टपरीधारकांने त्यांच्या व्यवसायाबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

२] भाडेकरू/टपरीधारकांनी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांत कोणत्याही प्रकारची मालमत्ता असल्याबाबतची माहिती प्रतिज्ञापत्रीत द्यावी लागेल. संबधितांकडे मालमत्ता असल्यास त्यानां गाळा देणे महानगरपालिकेस बंधनकारक राहणार नाही.

३] भाडेकरू/टपरीधारकांस हें तोडण्यापुर्वी जो व्यवसाय करीत असे त्याव्यतिरिक्त त्यांचा अन्य व्यवसाय नसल्याबाबतचे शपतपत्र.

४] भाडेकरू/टपरीधारकांस गाळा दिल्यानंतर इतरास पोटभाडेकरू ठेवता येणार नसल्याचे हमीपत्र.

५] काही भाडेकरूंनी गाळा प्रत्यक्ष ताब्यात घेतल्यापासूनचे भाडे अनामत रक्कमेसह महानगरपालिकेस जमा केल्यानंतरच करारनामा करण्यांत येईल. अन्यथा या अटीचे पालन न केल्यास संबधित गाळाधारकांस महानगरपालिकेच्या मालमत्तेतून काढून टाकणेत येईल.

६] या व्यवसायाव्यतिरिक्त उपजिविकेचे कोणतेही साधन नाही. व कुटूंबातील इतर कोणी नोकरीला अगर कामधंद्याचा नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक राहिल.

७] उपरोक्त नमूद धोरणात्मक अटीशर्तीचे पालन न केल्यास संबधीत गाळा धारकांवर कारवाई करण्याचा हक्क महानगरपालिकेने राखून ठेवला पाहिजे.

तसेच यासोबत नगरपरिषदेने पर्यायी व्यवस्था करणेबाबतचे पत्र दिलेल्या भाडेकरु व टपरीधारकाची यादी यासोबत जोडलेली आहे. कृपया सदरची बाब मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत आहे.

वरील प्रमाणे "अ" "ब" या दोन्ही प्रस्तावाना गोषवारानुसार कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

अनुमोदक मिलन पाटील

~~सूचक :- मुक्ता रंगाणकर~~

अनुमोदन :- ~~मिलन पाटील~~

सूचक & अनुमोदक मुक्ता रंगाणकर

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा-भाईंदर महानगरपालिका.

## तत्कालीन नगरपरिषदेचे भाडेकरूंची यादी.

| अ. क्र. | नांव. |
|---|---|
| १] | श्री. विष्णु वासुदेव शिरवळकर. |
| २] | श्री. हेमंत जगन्नाथ घरत. |
| ३] | श्री. नंदलाल माळी. |
| ४] | श्री. गणेश कावणकर. |
| ५] | श्री. सुरेश गंगाराम कावणकर. |
| ६] | श्री. भानु सुर्यवंशी. [सध्या श्री. शिवराम गुंडप्पा वंजरी] |
| ७] | श्री. शरद चेपलकर [सध्या श्री. आलम खान] |
| ८] | श्री. वासुदेव परशुराम किणी. [सध्या श्री. परमजित सिंग] |
| ९] | श्री. मोहन शंकर चव्हाण. |

## टपरीधारकांची यादी

| | |
|---|---|
| १] | श्री. निलेश अनंतराव मोहिले. |
| २] | श्री. रमेश जोशी. |
| ३] | श्रीम. अजिमा कुरेशी. |
| ४] | श्री. मिश्रीलाल वैष्णव. |
| ५] | श्री. उमाशंकर गुप्ता. |

(५३)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.२०/११/२००२

प्रकरण क्र.३३ :- दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्व्हेक्षण करणे बाबत.

ठराव क्र. ३९

मिरा भाईंदर महानगरपालिकेला केंद्र शासनाने दि.१/१२/९७ पासून सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना लागू केलेली आहे. सदर योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना लाभ द्यावा असे शासनाचे आदेश आहेत. त्याकरिता महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन १९९७-९८ या वर्षामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्वेक्षण झालेले आहे. त्यामध्ये २१८० कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आढळलेले आहे. परंतु सर्वेक्षणाच्या वेळेस जे कुटुंबे बंद आढळली आहेत व ज्या घरांचे सर्वेक्षण झालेले नाही असे त्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने निदर्शनास आणून दिले तर अशा घरांचे सर्व्हेक्षण करण्यात यावे असे शासन आदेश क्र. साशा/का-३/नपा-७/कावि-१९६५/०२ प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन व आयुक्त कोकण विभाग यांचे कार्याकक्ष कोकण भवन नवि मुंबई ६१४, दि.९/७/२००२ च्या आदेशामध्ये नमूद केलेले आहे. परंतु त्यांचे दरडोई मासिक उत्पन्न रु.४१९.९८ आहे. तसेच कुटुंबे दारिद्रय रेषेखालील कुटुंबात मोडतात. त्याकरिता महानगरपालिका क्षेत्रातील बंद कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- जोत्स्ना हसनाळे अनुमोदन :- सुरेखा गायकवाड

Hasnale 20/11/02 ठराव सर्वानुमते मंजूर. S. Y. Gaikwad 20-11-02

(signature)
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/११/२००२

**श्रंद्धांजलीचा ठराव क्र. ४० :-**

गोडदेव गावातील लोकशाहीर कै. भास्कर हरिश्चंद्र पाटील यांचे दहावासन दि. २/११/२००२ रोजी झाले आहे. त्याबद्दल ही सभा त्यांना श्रद्धांजली वहात आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

(५५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१२/२००२

**अभिनंदन ठराव क्र. ४१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत आलेले नवनिर्वाचित मा. आयुक्त, आर. डी. शिंदे सोा. यांचे ह्या सभागृहातील सर्व सदस्यांकडून स्वागत करण्यांत येत आहे. तसेच शिवमुर्ती नाईक सोा. यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेत केलेल्या चांगल्या कामाची नोंद घेतली असून त्यांचे ह्या सभागृहातील सर्व सदस्यांकडून अभिनंदन करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

(५८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१२/२००२

**अभिनंदन ठराव क्र. ४२ :-**

गुजरात राज्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने जे घवघवीत यश मिळविले त्याबद्दल श्री. नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करण्यांत येत आहे. त्याच बरोबर भारताचे पंतप्रधान मा. ना. श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचा ७८वा वाढदिवस २५ डिसेंबर, नाताळ या दिवशी आहे. तरी त्यांना वाढदिवसा निमित्त हार्दिक शुभेच्छा

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील.** **अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१२/२००२

**प्रकरण क्र. ३४ :- दि. २०/११/२००२ च्या इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ४३ :-**

दि. २०/११/२००२ च्या इतिवृत्तांतावर चर्चा केलेनुसार इतिवृत्तांत दुरुस्ती करुन कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील. अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा० महासभा दि० १८।१२।२००२

प्रकरण क्र.३५ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २००३-०४ करिता दैनंदिनी उपलब्ध करणे बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र.४४

मिरा भाईंदर महानगरपालिका नव्याने स्थापन झालेली असून तसेच प्रथमच महानगरपालिकेची निवडणूक झालेली आहे. तरी माहिती म्हणून पदाधिकारी , सदस्य यांचे दूरध्वनी क्रमांक शासकीय कार्यालयाच्या अधिका-यांचे पत्ते व दूरध्वनी राज्यातील महापालिका व नगरपालिका पदाधिकारी यांचे पत्ते व दूरध्वनी, सचिव मंत्री मंडळातील मंत्री महोदयाचे कार्यालयीन व निवास स्थानचे दूरध्वनी क्रमांक महापालिका हद्दीतील सर्व शासकीय कार्यालय हॉस्पीटले, अॅम्बुलन्स सुविधा पुरविणा-या संस्थेचे नांव व पत्ते तसेच, मिरा भाईंदर हद्दीतील पोलीस स्टेशनचे दूरध्वनी क्रमांक, महापालिका प्रगती अहवाल व पुढील काळात करावयाची महापालिकेची महत्वाची कामे अशा परिपूर्ण माहिती असलेली महापालिका दैनंदिनी २००३-२००४ छपाई करणेस येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस असे. इतर सर्व महापालिकेत याप्रकारच्या दैनंदिन छापणेची प्रथा असून आपल्या महापालिकेत सुध्दा २००३-०४ या वर्षाची दैनंदिन छापणेस येणा-या खर्चासमुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व प्रकरण ५ मधिल तरतूदीनुसार आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक :- हॅरल बोर्जीस

अनुमोदन :- असिफ शेख

ठराव सर्वानुमते मंजूर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१२/२००२

**प्रकरण क्र. ३६ :-** **नगरविकास विभागाकडून प्राप्त झालेले सन २००२-०३ कार्यक्रम अंदाजपत्रक मा. सदस्यांना उपलब्ध करुन देणेबाबत.**

**ठराव क्र. ४५ :-**

नगरविकास विभागाकडून प्राप्त झालेले सन २०२-०३ चे कार्यक्रम अंदाजपत्रक मा. सदस्यांना माहितीसाठी व अवलोकनार्थसाठी मिळालेले आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६/०१/२००३

**प्रकरण क्र. ३७ :-** **मागील सभा दि. १९/१२/२००२ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ४६ :-**

दि. १६/१/२००३ रोजी झालेल्या महासभेच्या वेळी मागील सभा दि. १९/१२/२००२ च्या इतिवृत्तांतात मा. सदस्यांनी सुचविलेल्या ग्रॅमेटीकल चुका दुरुस्त करुन सदरचे इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. लिओ कोलासो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६/०१/२००३

**प्रकरण क्र. ३८ :-** **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुचविल्याप्रमाणे पत्रात ५० द.ल.लि. योजनेतील प्रस्तावित नवघर येथील सम्प कनाकिया पार्क येथील इ. एस.आर. जवळ शिफ्ट करणे व गोडदेव येथीम सम्प रद्द करुन भाईंदर रेल्वे फाटक येथील अस्तित्वात असलेले सम्प व पंप हाऊसचा वापर करणेबाबत.**

**ठराव क्र. ४७ :-**

सदरचा विषय महत्वाचा असून याबाबत खास सभा लावण्यांत यावी व त्यानंतरच योग्य तो निर्णय घेऊन ठराव पारीत करण्यांत यावा. सद्यस्थितीत विषय प्रलंबित ठेवावा.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. लिओ कोलासो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

(82)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दिनांक १६/२/२००३

प्रकरण क्र.३९ :- **मौजे वर्सोवा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील जागा निवासी इमारतीसह ताब्यात घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेंस आर्थीक व प्रशासकीय मंजूरीबाबत.**

**ठराव क्र.४८**

मिरा भाईंदर महानगरपालिक दि. २८/२/२००२ पासून अस्तित्वात आली आहे. मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेत आ.क्र. ७८ च्या मुन्सीपल स्टाफ क्वार्टर्स हे आरक्षण प्रस्तावित असून या आरक्षाणाचे क्षेत्र २.३१ हेक्टर आहे व मालकी हक्क खाजगी असून जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे वर्सोवा येथे स.क्र. २० पै, २६, २७ पै., २८ पै. ही जागा मंजूर विकास योजनेस सार्वजनिक व निम सार्वजनिक वापर दर्शवला आहे. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील नवीन पुलाचे बांधकामासाठी या जागेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे विभागात व कार्यालयात (तात्पुरत्या कालावधीसाठी) बांधलेले आहेत. याबाबत बांधकाम विभागाकडे चौकशी केली असता राष्ट्रीय महामार्गावरील पुलाचे बांधकाम पुर्ण झाले असल्याने उपरोक्त नमूद जागेत विद्यमान असलेल्या कार्यालयीन व निवासी इमारतीची बांधकाम विभागास आवश्यकता नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका नव्याने झालेली आहे. अधिकारी व कर्मचारी यांचे निवासासाठी सध्या महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारती नाहीत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ह्या जागेची विद्यमान इमारतीसह मागणी केल्यास महानगरपालिकेसाठी कार्यरत अधिकाऱ्यांचे निवासस्थानाचा प्रश्न भागशः सुटू शकेल. याबाबत जागेची पाहणी व विकास योजना अवलोकन केले असता सदर जागेचे एकूण क्षेत्र १.९ हेक्टर असून या जागेवर निवासी इमारती व कार्यालये असे एकूण ९ इमारती असून बांधकामाचे क्षेत्र १६७७.०४ चौ.मी. आहे. सदर जागा इमारतीसह महानगरपालिकेकडे हस्तांतर करुन घेण्यासाठी प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मालकीची जागा विद्यमान इमारतीसह महानगपालिकेच्या ताब्यात घेण्यासाठी परिपूर्ण सादर सार्वजनिक बांधकाम विभाग व सक्षम अधिकाऱ्यांकडे सादर करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थीक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- लिओ कोलासो

अनुमोदन :- असिफ शेख

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६/०१/२००३

**प्रकरण क्र. ४० :-** मंजूर विकास योजनेचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये घनकचरा व्यवस्थापनाकरिता आरक्षण प्रस्तावित करणे.

**ठराव क्र. ४९ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना भागशः दि. १४ मे, १९९७ रोजी मंजूर झाली असून उर्वरीत विकास योजना २५ ऑगस्ट, २००० रोजी मंजूर झाली आहे.

मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. ५१ येथिल ग्राऊंड ४.०० हेक्टर हे आरक्षण शहरातील कचरा डंपींग करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले होते. सदर आरक्षणाखालील जागा मंजूर विकास योजना अहवालाप्रमाणे खाजगी दर्शविण्यांत आलेले आहे. त्यानुसार भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना दि. १५/१२/२००१ च्या पत्रान्वये सादर केला होता. तसेच मौजे भाईंदर स.क्र. ७२२ अ जुना, ३४२ (नविन) ह्या स.क्र. मध्ये नाविकास विभागात डंपींगसाठी १०.०० हेक्टर शासकीय जागेची मागणी केली होती. या दोन्ही जागा सी.आर.झेड. नियमाने बाधीत होत असल्याने सदर दोन्ही ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणे शक्य नाही म्हणून सदर जागेऐवजी पर्यायी जागेचा प्रस्ताव मौजे पाली स.क्र. ६५ क्षेत्र १०.७२ हेक्टर व मोजे उत्तन स.क्र. २५ क्षेत्र २०.७४ हेक्टर असे एकूण ३१.४६ हेक्टर शासकीय जागा मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना दि. २१/१२/२००२ रोजी सादर केला. सदरची जागा मंजूर विकास योजनेप्रमाणे डोंगराळ क्षेत्र या वापरासाठी प्रस्तावित केली आहे.

सदरची जागा मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचा आदेश क्र. महसुल/कक्ष-१/टे-१/एलबीपी/कावि-१५७२/२००२, दि. २६/१२/२००२ अन्वये आगाऊ ताबा देणे बाबत मंजूर झाले असून दिनांक ३१/१२/२००२ रोजी उपरोक्त नमूद क्षेत्रासाठी ७/१२ अभिलेखात इतर हक्कात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नांव नोंदविण्यांत आले आहे.

मौजे उत्तन व पाली येथील उपरोक्त जागेत विकास योजनेप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आरक्षण नसल्यामुळे सदर जागेची सन २००२ च्या बाजार मुल्य तत्वानुसार रक्कम भरावी लागेल असे आदेशात नमूद केले आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण व वनविभागाने घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० तयार केले असून सदर नियमाची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. सदरच्या नियमानुसार प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जागा दि. २१/१२/२००२ पूर्वी ताब्यात असणे बंधनकारक होते. त्या अनुषंगाने विहित कालमर्यादेत प्रकल्पाची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहे. तथापी सदर जागेचा वापर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प या सार्वजनिक प्रयोजनार्थ करावयाचा असल्यामुळे मंजूर विकास

योजनेत आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मंजूर विकास योजनेत फेरबदाची कार्यवाही करण्यासाठी आरक्षणाखलील एकूण ३१.४६ हेक्टर क्षेत्र घनकचरा व्यवस्थापन या आरक्षणाखाली प्रस्तावित करणे आहे. ही शासकीय जागा ३१.४६ हेक्टर आहे.

सदरचे फेरबदलाची कार्यवाही झाल्यास विकास योजनेत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आरक्षण प्रस्तावित होईल. तसेच महानगरपालिकेस सदरची जागा सार्वजनिक प्रयोजनार्थ वापरासाठी असल्यामुळे बाजारमुल्य किंमत भरावी लागणार नाही. सबब फेरबदलाची पुढील विहित कार्यवाही करण्यांस ही सभा आर्थिक प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक : श्री. मिलन म्हात्रे. अनुमोदन :- श्री. रतन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

(६४)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६/०१/२००३

**प्रकरण क्र. ४१ :-** **जकात कर लावणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ५० :-**

सदरचा गोषवारा उशीरा मिळाल्यामुळे त्यावर सदस्यांना जास्त माहिती मिळालेली नाही. त्यासाठी हा विषय प्रलंबीत ठेवून येत्या महासभेत निर्णयासाठी ठेवावा असा मी प्रस्ताव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६/०१/२००३

**अभिष्टचिंतन ठराव क्र. ५१ :-**

हिंदूहृदय सम्राट मा. शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या ७६व्या दि. २३/०१/२००३ रोजी वाढदिवसानिमित्त मी हार्दीक अभिष्टचिंतन ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदन :- श्री. अनंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

## मिरा भाईदर महानगरपालिका

### मा. महा सभा दिनांक ११/२/२००३

प्रकरण क्र. ४२ :- दि. १६/०१/०३ रोजीचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ५२

मा.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीनुसार दि. १६/ १ /२००३ रोजीचे इतिवृत्तांत कायम करणेत येत आहे.

सुचक :- श्री. आसिफ शेख    अनुमोदन :- श्री. तुळशीदास म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

(65)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा, दि. ११.२.२००३

प्रकरण क्र.४३:- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत नळाद्वारे पाणीपट्टीचे दर निश्चित करणेबाबत.

ठराव क्र. ५३

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत पूर्वी राबविण्यात आलेल्या ३१ द.ल.लि. योजनेतून यापूर्वी सुमारे २४ ते २५ द.ल.लि. व मुंबई महानगरपालिकेमार्फत ०.५ द.ल.लि. असा एकूण २४.५ ते २५.५ द.ल.लि. पाणी पुरवठा दररोज याप्रमाणे शहरास सुमारे ५० ते ६० तासांनी एक ते दीड तास झोन पध्दतीने पाणी पुरवठा होत होता. आता शहरासाठी राबविलेल्या अतिरिक्त ५० द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेतून सुमारे ३० ते ३३ द.ल.लि. पाणी पुरवठयाने वाढ झाली असून शहरास आजमितीस एकूण ५५ ते ५८ द.ल.लि. दररोज पाणी पुरवठा होत आहे. सदर पाणी पुरवठा स्टेम प्राधिकरण व मुंबई महानगरपालिका यांचेकडून रु.४/- प्रतिहजार लिटर या दराने होत असून या व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या आस्थापना खर्च ,पंपींग स्टेशनचे विज बील व देखभाल व दुरुस्ती, वितरण व्यवस्थेची देखभाल व दुरुस्ती, टँकरद्वारे करणेत येणा-या पाणी पुरवठयाचा खर्च व इतर आकस्मिक खर्च असा सुमारे १७.०० कोटी वार्षिक खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेमार्फत नागरिकांना रु.३.८० प्रति हजार लिटर घरगुती वापरासाठी व रु.१५/- प्रतिहजार लिटर बिगर घरगुती वापरासाठी पाणीपट्टीचा दर आकारण्यांत येत असून त्याद्वारे सुमारे ३.१८ कोटी वार्षिक महसूली उत्पन्न (सन २००१-०२ या आर्थिक वर्षात ) झाले आहे. शासनाच्या निर्देशानुसार पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे होणारी तूट भरुन काढणेसाठी महसुली उत्पन्न व महसुली खर्च यांचा मेळ घालण्यासाठी पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. तसेच ५० द.ल.लि. योजनेसाठी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण याचेकडून कर्ज घेताना त्यांचे सोबत केलेल्या करारनाम्यात त्यांनी ५० द.ल.लि. योजनेतून वाढीव पाणीपुरवठा सुरु झालेनंतर पाणीपट्टी दरवाढ करणेबाबत सुचविले आहे .

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन मा.स्थायी समिती सभा दि.१८/१/२००३ यानी ठराव क्र. नुसार शिफारस केल्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिटर पध्दतीने दि.१.४.२००३ पासून खालीलप्रमाणे दर आकारण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

मिटर पध्दतीने आकारावयाचा प्रस्तावित दर :-

| अ.क्र. | पाणी वापराचा प्रकार | सध्या आकारण्यात येणारा दर | प्रस्तावित पाणीपट्टीचा पाणीपट्टीचा दर |
|---|---|---|---|
| १. | घरगुती वापरासाठी | रु.३.८० प्रति १००० लिटर्स | रु.७.०० प्रति १००० लिटर |
| २. | बिगर घरगुती वापरासाठी | रु.१५.०० प्रति १००० लिटर्स | रु.२८.०० प्रति १००० लिटर |

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२००३

**प्रकरण क्र. ४४ :-** **दि. १८/०१/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीने शिफारस केलेल्या मालमत्ता कराच्या वाढीव दराबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र. ५४ :-**

तत्कालीन मिरा भाईंदर महानगरपालिकेस माहे ऑगस्ट १९९७ मध्ये अ वर्ग प्राप्त झालेला आहे. मिरा भाईंदर नगरपालिका भाडे मुल्याच्या रकमेवर २३ टक्के घरपट्टी आकारत होती. परंतु, सन १९९८-९९ पासून नगरपालिकेने सदर दरात वाढ करुन तो दर २५ टक्क्यांपर्यंत केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने (तत्कालिन नगरपालिका) शहरातील ५० द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेकरिता एम.एम.आर.डी.ए. कडून कर्ज रुपाने निधी उपलब्ध करुन घेतलेला आहे. सदरचा कर्जरुपी निधी उपलब्ध करुन घेतांना तत्कालीन नगरपालिकेने उपरोक्त संस्थेशी केलेल्या करारनाम्यातील अटीशर्ती नुसार (शेड्युल) एकत्रित मालमत्ता कराचा दर सन २०००-०१ पासून २५ टक्के करण्यांस मान्यता दिलेली होती. सदर दर वाढ करणे कामी तत्कालीन नगरपरिषदेने मान्यता द्यावयास हवी होती. परंतु याबाबत यावेळी निर्णय होऊ शकला नाही. याकरिता आज दि. १८/१/२००३ च्या स्थायी समितीच्या शिफारशीसह एकत्रित मालमत्ता कराचा दर २५ टक्क्यावरुन २८ टक्के करण्यांस सन २००३-०४ पासून ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२००३

**प्रकरण क्र. ४५ :-** **आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक यांना त्यांचे उत्कृष्ठ कामगिरी बाबत २ जादा वेतनवाढी देण्याबाबत.**

**ठराव क्र. ५५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन होते वेळी पासून श्री. शिवमुर्ती नाईक यांची शासनाने सदर महानगरपालिकेवर प्रथमतः प्रभारी आयुक्त म्हणून नेमणूक केली होती. तद्नंतर त्यांना गति पद्धतीने शासनाने आयुक्त पदाचा दर्जा दिला होता. तथापी श्री. शिवमुर्ती नाईक ह्यांची दि. २/१२/२००२ रोजी शासनाने अकस्मात बदली केल्यामुळे ह्या सभेस अतिशय दुःख होत आहे. कारण श्री. शिवमुर्ती नाईक हे आयुक्त म्हणून अधिकारावर येण्यापुर्वी अस्तंगत नगरपालिकेचे मुख्याधिकारी होते. तेव्हा पासून तर त्यांची बदली होईपर्यंतच्या काळात त्यांनी मिरा भाईंदर क्षेत्रासाठी उत्कृष्ठ काम केल्यामुळे त्यांचे कार्यकाळात खालील महत्वाची विकासाची, उत्पन्न वाढीची व नागरी सुविधांची कामे झाल्याचे तुलनात्मक दृष्ट्या दिसत आहे.

| सन १९८५ ते २००१ ची कारकीर्द | श्री. शिवमुर्ती नाईक यांची दि. १३ जुलै २००२ ते १ डिसेंबर २००२ पर्यंतची कारकीर्द. |
|---|---|
| १) खाजगी टँकरने पाणी पुरवठा | १) पुर्णपणे खाजगी टँकर बंद करुन नळाद्वारे मुबलक पाणी पुरवठा सुरु केले. |
| २) सन १९९३ ते २००१ पर्यंत नळ कनेक्शन देणे बंद. | २) नळ कनेक्शन देणे सुरु केले अंदाजे रुपये ३०,०००/- प्रमाणे प्रत्येकी कनेक्शन चार्जेस सुरु केले (अंदाजे ४८०० अर्ज आले आहेत.) |
| ३) रस्त्यावरील दुकानाचे आरसीसी व इतर सुमारे ३५०० अतिक्रमणे होती (सरासरी ३०.० रस्ते होते.) | ३) ३५०० अतिक्रमणे दुर करुन ६० फुट व त्यापेक्षा जास्त रुंदीचे रस्त्याचे प्रशस्त रस्ते फुटपाथसह तयार केले. |
| ४) अनधिकृत नळ कनेक्शन (सन १९९३ ते २००१ पर्यंत) | ४) अनधिकृत नळ कनेक्शन शोधून काढून प्रत्येकी अंदाजे रु. ६०,०००/- रक्कम दंड करुन व पाणीपट्टी असे एकूण रु. ८.०० कोटी वसूल केले रु. २.०० कोटी करणे. बाकी व सदर कनेक्शनची पाणीपट्टीत भर पडली (महाराष्ट्रातील पहिली नगरपालिका) |

| सन १९८५ ते २००१ ची कारकीर्द | श्री. शिवमुर्ती नाईक यांची दि. १३ जुलै २००२ ते १ डिसेंबर २००२ पर्यंतची कारकीर्द. |
|---|---|
| ५) गेल्या ७ ते ८ वर्षात आकारणी व केलेल्या मिळकती | ५) सुमारे २९,००० मिळकतीचा त्याच कर्मचाऱ्यांकडून शोध घेऊन आकारणी केली त्यामुळे कायम स्वरुपी रु. १२.४३ कोटी एवढ्या रक्कमेची उत्पन्नात वाढ झाली. |
| ६) बंद पडलेल्या उड्डाण पूलाचे काम. | ६) युद्ध पातळीवर सुरु केले. |
| ७) अनेक मजली अनधिकृत बांधकामे उभी राहिली. | ७) जवळ जवळ ९० टक्के पूर्णपणे अनधिकृत बांधकामावर नियंत्रण आणले. १० टक्के अतिक्रमण तोडणे शिल्लक आहेत. |
| ८) घरोघर जाऊन वसूली करीत होते तरी ही ४० ते ४५ टक्के वसुली होत होती. (थकबाकी १५.०० कोटी चालू मागणी १५.०० कोटी नविन वाढीव सोडून) | ८) घरोघर जाऊन वसूली करण्याची पद्धत बंद केली. नियमाप्रमाणे कडक कारवाई करणे नळ कनेक्शन तोडणे अशा कारवाई मुळे ७६ टक्के वसूली केली. (मनपाच्या इतिहासातील हा वसुलीचा उच्चांक आहे.) |
| ९) आरोग्य | ९) गावातील संपूर्ण कचराकुंड्या काढून टाकून घरोघर कचरा गोळा करणे २२ ऑगस्ट २००२ पासून सुरु केले. (महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका) |
| १०) रु. २९,०००/- वार्षिक जाहिरातीचे कर मिळत होता. | १०) जाहिरातीचे टेंडर काढून रु. २८.०० लक्ष वार्षिक उत्पन्नात वाढ केली. दुकानावरील बोर्ड जाहिरात रु. १.५० कोटीनी उत्पन्न वाढविले. |
| ११) अ) मिळकत हस्तातरण फी रु. ५/- होती. | ११) अ) मिळकत हस्तातरण फी रु. ५००/- केली होती. |
| ब) ना हरकत दाखला फी रु. १००/- होती. | ब) नाहरकत दाखला फी रु. ३०००/- ते १०,०००/- (व्यवसायिक) केली. |
| क) कनेक्शन ट्रान्सफर फी रु. १००/- होती. | क) कनेक्शन ट्रान्सफर फी रु. २,५००/- केली वरील उत्पन्न वाढीमुळे उत्पन्नात सुमारे ८०.०० लक्ष ते १.०० कोटी पर्यंत भर पडणार आहे. |

टीप :-

१) महानगरपालिकेच्या मुदत ठेवी न मोडता सर्व खर्च काटकसरीने करुन ८.० कोटी कर्ज फेडले.

२) स्वखर्चाने वाहतूक बेट बांधून देखभाल व दुरुस्तीसह २० ठिकाणी कार्यादेश देऊन कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे निधीची सुमारे ६०.०० लक्ष पर्यंत बचत होणार आहे.

३) दवाखाना सुद्धा बांधण्याचे असून गेले पाच महिन्यापुर्वी अंदाजपत्रक व आराखडे तयार केले असून जागा ताब्यात मिळताच महासभेपुढे ठेवण्याची योजना होती.

४) बांधा वापरा व हस्तांतर करा ह्या तत्वावर सुलभ शौचालयाची कामे सुरु केली.

५) खाजगी संस्थेकडून मिरा रोड येथील स्मशानभूमी, दफनभूमी, ब्यूरल ग्राऊण्ड बांधून घेण्याचे काम सुरु केल्याने महानगरपालिकेची सुमारे १.५० कोटी रक्कमेची बचत झाली.

६) उत्तपन पाणी पुरवठा योजना ५० द.ल.लि. शिल्लक रक्कमेतून करण्याचे प्रस्तावित केले.

७) आज पर्यंतच्या इतिहासात प्रथमच महसूल अधिकाऱ्याशिवाय संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडली.

नगरपालिकेचा तुटपुंजा कर्मचारी वर्ग असतांनाही आपल्या बुद्धी चातुर्याने नागरिकांचे हिताचा विचार डोळ्यासमोर ठेऊन उत्पन्न वाढविणे, नागरी सुविधा चागल्या प्रकारे पुरविणे व काटकसर करुन विकास कामे गेली अनेक वर्षे जी झाली नव्हती ती दिड वर्षाच्या कालावधीत हाती घेऊन पुर्ण केली. महानगरपालिकेत त्यांनी उत्कृष्ट कार्ये केल्यामुळे शासनातील कर्तबगार व प्रगतशील विचारांचे अधिकारी वर्गाचा न्यायोचित आदर होणे ह्या सभागृहास आवश्यक वाटत असल्याने सदर सभागृह श्री. शिवमुर्ती नाईक यांचे कामाचा गौरवपुर्ण उल्लेख करीत आहे व त्यासाठी त्यांना २ वेतनवाढी देण्याबाबत शासनास शिफारस करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २४/०२/२००३

**प्रकरण क्र. ४६ :- जकात कर लावणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ५६ :-**

मिरा भाईंदर नगरपालिकेची दि. २८/२/२००२ रोजी महापालिका झाली असून तत्कालिन नगरपालिका असतांना महाराष्ट्र शासनाने दि. १/५/९९ पासून जकात कर रद्द करुन त्याबदल्यात जकातीचया उत्पन्नाएवढी प्रतिवर्षी दहा टक्के वाढ विचारात घेऊन अनुदान देण्याचे सुरु केले आहे. त्यानंतर नगरपालिकेने अथवा महानगरपालिकेने स्वतःचे उत्पन्न वाढविण्याचे स्तोत्र निर्माण करावेत असे निर्देश दिलेले आहेत.

मिरा भाईंदर दि. २८/२/२००२ रोजी महानगरपालिका झाल्यानंतर महापालिकेला जकात किंवा उपकर लावण्याबाबतचे धोरण ठरविण्याचा अधिकार महापालिकेस आहेत. महानगरपालिका झाल्यामुळे जकात अनुदान बंद करण्याचे शासनाचे धोरण आहे. महानगरपालिका क्षेत्रात १० ते १२ हजार लहान मोठे उद्योगधंदे असून अंदाजे २५ हजाराच्या आसपास छोटी मोठी दुकाने आहेत. उपकराच्या कार्यप्रणाली प्रमाणे ज्या ठिकाणी मासिक ५ हजाराच्या उलाढाला प्रत्येक महिन्याला आयात होणाऱ्या मालाची रजिस्टरला किंवा धंद्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन तपासणी करुन शकतात व त्यामध्ये दोषी आढळल्यास त्यांचेविरुद्ध न्यायालयात अभियोग दाखल करणेचे अधिकार आहे. तसेच उपकराचा भरणा व्यापाऱ्याने स्वतःहून महानगरपालिका ठरवून देईल त्या ठिकाणी भरणा करावयाचा आहे.

जकात कर हा महानगरपालिका हद्दीत मालाची आयात होताना महानगरपालिकेने बसविलेल्या नाक्यावर आयातिकाकडील बीले दाखवून भरावयाचा असतो. बील योग्य आहे का? बीलाप्रमाणे माल बरोबर आहे का? यांची तपासणी करुनच जगात वसूल केला जातो. या प्रकारात जकात भरल्याशिवाय माल हद्दीत घेता येत नाही व चोरी केल्यास दंडात्मक किंवा न्यायालयात फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे अधिकार आहे. जकातीचे उत्पन्न हे रोजच्या रोज मिळणारे उत्पन्न आहे व त्यामुळे दैनंदिन कामाला चालना मिळणार आहे.

**जकात कर**

१) शहराला आयात होणाऱ्या खप, वापर, विक्री मालावर लावता जातो.

२) कमाल व किमान दर निश्चिती करण्याचे अधिकार महासभेस आहेत.

३) मालाच्या किंमतीवर (वाहतूक व इतर टॅक्स धरुन) निश्चित केलेल्या दराने आकारणी केली जाते.

४) सीमेवरुन हद्दीत येतानाच जकात कर भरावा लागतो.

५) या प्रकारात जकात आयातीच्या वेळीच स्विकारल्यामुळे दैनंदिन कामासाठी पैसा उपलब्ध होऊ शकतो.

६) मुल्यामध्ये चोरी केल्यास अथवा जकात चुकवून गेल्यास वाहन अटकावून दंडासकट रक्कम वसूल करणे किंवा न्यायालयात फौजदारी गुन्हा दाखल करणेचा अधिकार महापालिकेस आहेत.

७) जकातीमध्ये वाहन नाक्यावर आल्यानंतर जकातीची रक्कम जमा करुन पुढे जावे लागते. त्यामुळे उत्पन्न दैनंदिन व निश्चित स्वरुपाचे असते.

वरील बाबींचा विचार करता महानगरपालिकेस जकात लावणेस मंजूरी देत आहोत. मात्र सध्या महानगरपालिकेकडे अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे जकात वसुलीचा ठेका देणेकरिता खालीलप्रमाणे निश्चित करण्यांत येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शासनाकडून मिळणारे वार्षिक अनुदान | - | २६,५५,७२,०००/- |
| २) | आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना वेतनांची ५० टक्के रक्कम | - | ६८,१०,२००/- |
| | एकूण | - | २७,२३,८२,२००/- |
| ३) | २० टक्के वाढीची रक्कम | - | ५,४४,७६,४३०/- |
| | किमान देकार | - | ३२,६८,५८,६६०/- |

वरील देकाराप्रमाणे निविदा काढून जकात वसुलीचा ठेका देणेंस व यास राज्य शासनाच्या मंजुरीसाठी पाठविणेस राज्य शासनाच्या मंजूरीप्रमाणे कार्यवाही करणेंस मंजूरी देणेंत येत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव बहुमताने मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२००३

प्रकरण क्र. ४७ :- मंजूर विकास योजनेतील भाजी मार्केट (आ.क्र. ६८ अे) या जागेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मुस्लिम व बोहरा समाजासाठी दफनभूमी म्हणून आरक्षण दर्शविण्यासाठी फेरबदलाची कार्यवाही करणे.

ठराव क्र. ५७ :-

सदरचा विषय पुढील महासभेत घेण्यांत यावा असे ही सभा सुचित करीत आहे.

सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्रीम. जेन्वी अल्मेडा.

ठराव सर्वानुमते मंजुर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २४/०२/२००३

प्रकरण क्र. ४८:- पाणी पुरवठा बाबत विचार विनीमय करणे

ठराव क्र. ५८

सदरचा प्रस्ताव तहकुब करण्यात आला.

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२००३

**ठराव क्र. ५७ अ :-**

भारताच्या पहिल्या अंतराळवीर कु. कल्पना चावला यांचे अपघाती निधन झाले असल्याने त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभावी याकरिता सर्व सभासदांनी त्यांना श्रद्धांजली वाहणेकरिता दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२००३

**प्रकरण क्र. ४९ :-** **मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००३/०४ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत.**

**ठराव क्र. ५९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००२/२००३ चे सुधारीत व सन २००३/२००४ चे मुळ अंदाजपत्रका बाबतची कार्यालयीन विविरण पत्रे, अहवाल व मा. स्थायी समिती ठराव क्र. ११६दि. ७/३/२०३ विचारात घेवून सन २००२/२००३ चे सुधारीत व सन २००३/२००४ चे मुळ अंदाजपत्रकास आजची सभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढील प्रमाणे.

| | | **२००३/२००४** |
|---|---|---|
| उत्पन्न :- | ''अ'' अंदाजपत्रक | १०९९२.३४ लाख |
| | ''ब'' अंदाजपत्रक | -- |
| | ''क'' अंदाजपत्रक | २५२३.४० लाख |
| | **एकूण** | **१३५१५.७४ लाख** |
| खर्च :- | ''अ'' अंदाजपत्रक | १०९०४.०२ लाख |
| | ''ब'' अंदाजपत्रक | ५०.०० लाख |
| | ''क'' अंदाजपत्रक | २५२३.४० लाख |
| | अखेरची शिल्लक | ३८.३२ लाख |
| | **एकूण** | **१३५१५.७४ लाख** |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०३/२००३

**दुःखवठा ठराव क्र. ६० :-**

मिरा भाईंदर परिसरातील काँग्रेस सेवा दलाचे अध्यक्ष आणि भाईंदरचे जूने सामाजिक कार्यकर्ते रामजीभाई सिंघानिया यांचे होळीच्या दिवशी हृदयविकाराने निधन झालेले आहे. तसेच जिल्हा परिषदेचे वैद्यकिय अधिकारी डॉ. धोत्रे हयांच्या वडीलांचे सुध्दा निधन झालेले आहे. तरी ही महासभा त्यांना श्रध्दांजली अर्पण करते.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**
**श्री. मिलन म्हात्रे**

**अनुमोदन :- श्री. मोहन पाटील**
**श्री. सुरेंद्रप्रसाद तिवारी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**